# प्रकरण चार

## इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावरील

## मराठी विषयाच्या अध्यापनविषयक समस्या

४.१ प्रस्तावना

४.२ मराठीच्या अध्यापकांची शैक्षणिक पात्रता

४.३ इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषय शिकविणा-या अध्यापकांचा अध्यापन अनुभव

४.४ इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी भाषेचा स्तर

४.५ इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी भाषेच्या अध्यापनाची उद्दिष्टे

४.६ मराठी विषयाचे अध्यापन करताना येणा-या अडचणी

४.७ मराठीचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी आवश्यक असणा-या बाबी

४.८ मराठीचे अध्यापन करण्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत माध्यमिक स्तरावर वापरल्या जाणा-या पध्दती

४.९ मराठीच्या पद्य विभागाचे अध्यापन

४.१० मराठीच्या व्याकरणाचे अध्यापन

४.११ मराठीतील निरनिराळ्या लेखन-प्रकारांचे अध्यापन

४.१२ मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयीचा दृष्टीकोन

४.१३ मराठीच्या अध्यापनात इंग्रजी माध्यमाचा परिणाम

४.१४ इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीचे अध्यापन परिणामकारक होण्याच्या दृष्टीने मराठीच्या अध्यापकांनी व्यक्त केलेल्या अपेक्षा

४.१५ संशोधनास आवश्यक अशा बाबी

४.१६ समारोप

## प्रकरण चार

## इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावरील मराठी विषयाच्या अध्यापनविषयक समस्या

४.१] प्रस्तावना :-

मागील प्रकरण तीन "इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावरील मराठी विषयाच्या अध्ययनविषयक समस्या" यामध्ये विद्यार्थ्यांकडून भरून घेतलेल्या प्रश्नावलीद्वारे गोळा केलेल्या माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण करून अन्वयार्थ लावला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावरील मराठी विषयाच्या अध्यापनविषयक समस्यांचा विचार केलेला आहे. या समस्या जाणून घेण्यासाठी मराठी हा विषय शिकविणाऱ्या अध्यापकांसाठी एक प्रश्नावली तयार केलेली होती. या प्रश्नावलीची समग्र माहिती प्रकरण क्रमांक १ पान नंबर १६ मध्ये दिलेली आहे. प्रश्नावली परिशिष्ट-"ब" मध्ये दिलेली आहे. ही प्रश्नावली मिरज तालुक्यातील इंग्रजी माध्यमाच्या सर्व म्हणजे आठ शाळांमधील मराठी विषय शिकवणाऱ्या सर्वच्या सर्व म्हणजे पंचवीस शिक्षकांना देण्यात आली. सर्वच्या सर्व अध्यापकांनी प्रश्नावली भरून दिली. परिशिष्ट-"ड" मध्ये त्या अध्यापकांची यादी दिलेली आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये या अध्यापकांनी भरून दिलेल्या प्रश्नावल्यांचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावला आहे. प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक १ व २ मध्ये अनुक्रमे अध्यापकाचे नाव व शाळेचे नाव लिहिण्यास सांगितले होते.

४.२] मराठीच्या अध्यापकांची शैक्षणिक पात्रता :-

मराठीच्या अध्यापकांची पात्रता जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक ३ ची योजना केलेली आहे. प्रस्तुत प्रश्नाला

दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ४.१ मध्ये वर्गीकरण केलेले आहे.

सारणी क्रमांक ४.१

अध्यापकांची शैक्षणिक पात्रता

| अनुक्रम | पदवी + व्यावसायिक पात्रता | अध्यापकांची संख्या |
|---|---|---|
| १ | एस.एस.सी. | १ |
| २ | बी.ए. | ८ |
| ३ | बी.कॉम्. | १ |
| ४ | एम.ए. | १५ |
| | एकूण - | २५ |

माध्यमिक शाळेत शिकविण्यासाठी कमीत कमी शैक्षणिक पात्रता पदवी परीक्षा उत्तीर्ण असणे आणि व्यावसायिक पात्रता बी.एड्. अथवा डी.एड्. उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. वरील सारणी क्रमांक ४.१ वरून असे निदर्शनास येते की, एम.ए. ही पदवी मिळविणारे १५ शिक्षक आहेत, बी.ए. ही पदवी मिळवणारे ८ शिक्षक आहेत, आणि बी.कॉम्. १ आणि एस.एस.सी. झालेले १ आहेत.

यावरून हे सर्व शिक्षक माध्यमिक शाळेत शिकविण्यासाठी आवश्यक असलेली कमीत कमी शैक्षणिक अर्हता धारण करतात असा निष्कर्ष निघतो.

तथापि मराठी विषय शिकविण्यासाठी पदवी परीक्षेला "मराठी" हा विषय असणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक चार मध्ये पदवी परीक्षेचा मुख्य विषय व ऐच्छिक विषय कोणते याची विचारणा करण्यात आली होती. याद्वारे मिळालेली माहिती सारणी क्रमांक ४.२ मध्ये स्पष्ट केलेली आहे.

सारणी क्रमांक ४.२

<u>अध्यापकांचे पदवी परीक्षेचे मुख्य व गौण विषय</u>

| अनुक्रम | पदवी परीक्षेचा मुख्य विषय | अध्यापक संख्या | पदवी परीक्षेचा गौण विषय | अध्यापक संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मराठी | ९ | मराठी | ३ |
| २ | हिंदी | ४ | हिंदी | ४ |
| ३ | इंग्रजी | ५ | इंग्रजी | १ |
| ४ | इतिहास | ३ | इतिहास | ३ |
| ५ | भूगोल | १ | भूगोल | २ |
| ६ | हिशोबशास्त्र | १ | हिशोबशास्त्र | - |
| ७ | संस्कृत | २ | वाणिज्य | १ |
| ८ | | | संस्कृत | ४ |
| ९ | | | मानसशास्त्र | ३ |
| १० | | | राज्यशास्त्र | २ |
| ११ | | | समाजशास्त्र | १ |
| १२ | | | गौण विषय नाही | - |
| | एकूण - | २५ | एकूण - | २४ |

एक शिक्षक एस.एस.सी., डी.एड्. असल्यामुळे त्यांनी गौण विषय दिलेला नाही. म्हणून ती संख्या २४ भरली.

वरील सारणी क्रमांक ४.२ वरून असे निदर्शनास येते की, पदवी परीक्षेला मराठी विषय असणारे ९ अध्यापक आहेत. एकूण अध्यापक संख्येच्या तुलनेत ही संख्या खूप म्हणजे निम्म्यापेक्षाही कमी आहे. ही बाब चिंतनीय आहे. पदवी परीक्षेस मराठी हा गौण विषय असणारे अध्यापक तीन आहेत म्हणून एकूण १२ अध्यापक मराठी विषय शिकविण्यास आवश्यक असलेली अर्हता प्राप्त करणारे आहेत.

कांही अध्यापकांचे हिंदी, इंग्रजी व संस्कृत हे प्रमुख किंवा गौण विषय आहेत. हेही भाषा विषय असल्याने वेळापत्रकाच्या सोयीसाठी व शिक्षकांच्या तासिकांची संख्या पर्याप्त होण्यासाठी या शिक्षकांना मराठी हा भाषा-विषय शिकविण्यास सांगितले असल्यास ते योग्य ठरेल. परंतु इतिहास, भूगोल, हिशोबशास्त्र, मानसशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, वाणिज्य हे विषय प्रमुख वा गौण असूनही हे अध्यापक मराठी विषयाचे अध्यापन करतात ही बाब मोठी चिंतनीय आहे.

मराठी विषय प्रमुख [फार तर गौण] असणाऱ्या अध्यापकांचीच मराठी विषय शिकविण्यासाठी नेमणूक व्हावी किंवा अशा अध्यापकांना मराठी विषय घेऊन पुन्हा योग्य ती अर्हता प्राप्त करण्याविषयीची अट घालावी असे सुचवावे वाटते. विशेषत: इंग्रजी माध्यमाच्या शाळेत अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना हे आवश्यक आहे.

अध्यापक प्रश्नावलीच्या प्रश्नक्रमांक ५ मध्ये पदव्युत्तर पदवी असल्यास त्या परीक्षेचा प्रमुख विषय व गौण विषय कोणते याविषयी विचारणा करण्यात आलेली होती. या प्रश्नाला मिळालेल्या माहितीचे वर्गीकरण व विश्लेषण सारणी क्रमांक ४.३ मध्ये स्पष्ट केलेले आहे.

सारणी क्रमांक ४.३

पदव्युत्तर परीक्षेस मुख्य व गौण विषय असलेल्या अध्यापकांची संख्या

| अनुक्रम | पदव्युत्तर परीक्षेचा मुख्य विषय | अध्यापक संख्या | पदव्युत्तर परीक्षेचे गौण विषय | अध्यापक संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | मराठी | ८ | मराठी | १ |
| २ | हिंदी | ४ | हिंदी | १ |
| ३ | इंग्रजी | २ | इंग्रजी | ३ |
| ४ | संस्कृत | १ | संस्कृत | १ |
| ५ | | | इतिहास | १ |
| ६ | | | गौण नसलेले | ९ |
| | एकूण | १५ | एकूण | १६ |

एका अध्यापकाचे गौण विषय दोन असल्यामुळे ती संख्या सोळा झाली आहे.

वरील सारणी क्रमांक ४.३ वरून असे दिसून येते की, मराठी विषय शिकविणाऱ्या २५ अध्यापकांपैकी १५ अध्यापकांकडे पदव्युत्तर पदवी असून त्यापैकी ८ अध्यापकांनी मराठी हा विषय घेतलेला आहे.

मराठी विषय इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकविणाऱ्या अध्यापकांची व्यावसायिक पात्रता जाणून घेण्याच्या इच्छेने अध्यापक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक ६ ची योजना केलेली होती. या प्रश्नाला दिलेली माहिती सारणी क्रमांक ४.४ मध्ये दिलेली आहे.

सारणी क्रमांक ४.४

मराठी विषयाच्या अध्यापकांची व्यावसायिक पात्रता

| अनुक्रम | पात्रता | अध्यापक संख्या |
|---|---|---|
| १ | डी.एड्. | ३ |
| २ | बी.एड्. | १९ |
| ३ | बी.पी.एड्. | १ |
| ४ | कोणतीही व्यावसायिक पात्रता नसलेले | २ |
| | एकूण - | २५ |

वरील सारणी क्रमांक ४.४ वरून असे निदर्शनास येते की, बी.एड्. ही आवश्यक व्यावसायिक पात्रता असणारे १९ अध्यापक, तर डी.एड्. ही व्यावसायिक पात्रता असणारे तीन अध्यापक आहेत ही समाधानाची बाब आहे. एक अध्यापक खेळाची व्यावसायिक पात्रता बी.पी.एड्. ही पदवी असूनही मराठी विषयाचे अध्यापन करताना दिसून येतात, आणि दोन अध्यापक व्यावसायिक पात्रता नसलेले आहेत.

कोणत्याही माध्यमाच्या माध्यमिक शाळेत मराठी विषय शिकवावयाचा

असल्यास पदवी परीक्षेला मराठी विषय असणे ज्याप्रमाणे आवश्यक आहे, त्याचप्रमाणे व्यावसायिक परीक्षेसाठी म्हणजे बी.एड्. पदवीसाठी मराठी अध्यापन पध्दती हा विषय घेणे क्रमप्राप्त आहे. यासाठीच अध्यापकांसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीमध्ये असलेल्या प्रश्न क्रमांक ७ मध्ये बी.एड्. ला निवडलेल्या अध्यापन पध्दती कोणत्या हे जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद पुढील सारणी क्रमांक ४.५ मध्ये नोंदविलेला आहे.

सारणी क्रमांक ४.५

मराठी विषय शिकविणा-या अध्यापकांनी बी.एड्.ला निवडलेल्या अध्यापन पध्दती

| अनुक्रम | अध्यापन पध्दती | अध्यापक संख्या |
|---|---|---|
| १ | मराठी | १४ |
| २ | हिंदी | १० |
| ३ | इंग्रजी | ७ |
| ४ | संस्कृत | १ |
| ५ | इतिहास | ४ |
| ६ | भूगोल | २ |
| | एकूण - | ३८ |

३ अध्यापक डी.एड्., १ बी.पी.एड्., व २ व्यावसायिक पात्रता नसणारे अध्यापक असल्याने वरील संख्या ३८ आली.

मराठी व्यतिरिक्त हिंदी, इंग्रजी, संस्कृत या अध्यापन पध्दती घेतलेल्या अध्यापकांना त्या भाषा विषयाच्याच अध्यापन पध्दती असल्यामुळे मराठी विषय शिकविण्यास दिला असेल तर एक वेळ समजू शकते, परंतू इतिहास, भूगोल अगर बी.पी.एड्. च्या शिक्षकांना मराठी विषय शिकविण्यासाठी देणे हे मात्र अनाकलनीय आहे.

## ४.३] इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषय शिकविणा-या अध्यापकांचा अध्यापन अनुभव :-

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे मिरज तालुक्यातील आठ इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी विषयाच्या पंचवीस अध्यापकांनी प्रश्नावली भरून दिली.

प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ८ मध्ये अध्यापकांना त्यांचा माध्यमिक शाळेतील अनुभव नोंदविण्यास सांगितला होता. प्रस्तुत प्रश्नाला अध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादाचे पुढील सारणी क्रमांक ४.६ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ४.६

अध्यापकांचा अध्यापनानुभव

| अनुक्रम | अध्यापन अनुभव [वर्षांच्या वर्गांतरामध्ये] | अध्यापक संख्या |
|---|---|---|
| १ | २० ते २२ | - |
| २ | १७ ते १९ | २ |
| ३ | १४ ते १६ | ५ |
| ४ | ११ ते १३ | ५ |
| ५ | ८ ते १० | ३ |
| ६ | ५ ते ७ | ३ |
| ७ | २ ते ४ | ६ |
| ८ | २ पेक्षा कमी | १ |
| | एकूण - | २५ |

वरील सारणी क्रमांक ४.६ वरून असे दिसून येते की, प्रतिसाद देणा-या अध्यापकांचा इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेत शिकविण्याचा एकूण अनुभव कमीत कमी एक वर्षापासून १९ वर्षापर्यन्त आहे. हा अनुभव लक्षात घेण्याजोगा आहे. सारणी क्रमांक ४.६ वरून मराठीच्या अध्यापकांच्या

इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेत शिकविण्याच्या अनुभवाचे मध्यमान खालीलप्रमाणे काढता येईल.

सारणी क्रमांक ४.६ वरून काढलेले मध्यमान

अध्यापकांचा शिकविण्याचा एकूण अनुभव

| वर्गांतरे | वारंवारिता f | विचलन d | गुणाकार fd |
|---|---|---|---|
| २० ते २२ | ० | ४ | ० |
| १७ ते १९ | २ | ३ | ६ |
| १४ ते १६ | ५ | २ | १० |
| ११ ते १३ | ५ | १ | ५ २१ |
| ८ ते १० | ३ | ० | ० |
| ५ ते ७ | ३ | - १ | - ३ |
| २ ते ४ | ६ | - २ | - १२ |
| २ पेक्षा कमी | १ | - ३ | - ३ |
| | | | - १८ |
| | | | + ३ |

मध्यमान (Mean) = गृहित मध्यमान (A.M.) + $\frac{\text{गुणाकार [fd]}}{\text{एकूण गुणक [N]}}$ x वर्गांतर लांबी [ I ]

$= ९ + \frac{३}{२५} \times ३$

$= ९ + \frac{९}{२५}$

$= ९ + ०.३६$

$= ९.३६$ ∴ मध्यमान = ९.३६

मिरज तालुक्यातील इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळामधून शिकविणा-या अध्यापकांच्या एकूण अनुभवाचे मध्यमान ९.३६ वर्षे इतके आहे. हा अनुभव निश्चितच चांगला आहे असे म्हणावे लागेल. या

अध्यापकांचा माध्यमिक शाळेत मराठी विषय शिकविण्याचा अनुभव जाणून घेण्याच्या दृष्टीने अध्यापकांच्या प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक ९ ची योजना केलेली होती. या प्रश्नाला मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण सारणी क्रमांक ४.७ मध्ये केले असून त्यावरुन मध्यमानही काढलेले आहे.

सारणी क्रमांक ४.७

इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेत मराठी विषय शिकविण्याचा अनुभव

| वर्गांतर | वारंवारिता f | विचलन d | गुणाकार fd | |
|---|---|---|---|---|
| २० ते २२ | ० | ४ | ० | |
| १७ ते १९ | १ | ३ | ३ | |
| १४ ते १६ | २ | २ | ४ | |
| ११ ते १३ | ३ | १ | ३ | |
| ८ ते १० | २ | ० | ० | १० |
| ५ ते ७ | ७ | – १ | – ७ | |
| २ ते ४ | ६ | – २ | – १२ | |
| २ पेक्षा कमी | ४ | – ३ | – १२ | – ३१ |

$$\text{मध्यमान} = \underset{\text{A.M.}}{\text{गृहित मध्यमान}} + \frac{\text{गुणाकार } fd}{\text{एकूण गुणक } (N)} \times \text{वर्गांतर मध्य } (I)$$

$$= ९ - \frac{३१}{२५} \times ३$$

$$= ९ - १.२४$$

$$= ८.७६$$

मध्यमान = **८.७६**

वरील सारणी क्रमांक ४.७ वरुन असे दिसून येते की, इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळेत मराठी विषय शिकविण्याचा अनुभव एक वर्षापासून ते १९ वर्षापर्यन्त आहे. तसेच अनुभवाचे मध्यमान ८.७६ इतके आहे. हा अनुभव ब-यापैकीच आहे असे वाटते.

मिरज तालुक्यातील इंग्रजी माध्यमाच्या शाळांमधून मराठी विषय शिकविणा-या अध्यापकांचा शिकविण्याचा एकूण अनुभव [मध्यमान ९.३६] आणि मराठी विषय शिकविणा-या अध्यापकांचा अनुभव [मध्यमान ८.७६] इतका आहे. त्यांच्या या ब-यापैकी असलेल्या अनुभवावर आधारित त्यांचा प्रतिसादाची व मतांची विश्वसनीयता व ग्राह्यता असली पाहिजे.

अध्यापक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १० ची योजना अध्यापकांचा १० वी [एस.एस.सी.] च्या वर्गाला मराठी विषय शिकविण्याचा अनुभव जाणून घेण्याच्या उद्देशाने केलेली होती. त्यास मिळालेल्या प्रतिसादावरून असे निदर्शनास आले की, २५ अध्यापकांपैकी १५ अध्यापकांना १० वी च्या विद्यार्थ्यांना मराठी विषय शिकविण्याचा १ वर्षापासून १२ वर्षापर्यन्त अनुभव आहे.

एकंदरीत पाहता इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये मराठी विषय शिकविण्याचा अनुभव ब-यापैकीच आहे असे वरील वर्गीकरणाच्या आधारे म्हणता येईल.

## ४.४] <u>इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी भाषेचा स्तर</u> :-

इंग्रजी माध्यमातील शाळेतून शिकविल्या जाणा-या मराठी भाषेचा स्तर जाणून घेण्याच्या उद्देशाने अध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक ११.अ ची योजना केलेली होती. त्या प्रश्नाला मिळालेल्या प्रतिसादानुसार २५ अध्यापकांपैकी २० अध्यापकांनी मराठी भाषा द्वितीय स्तरावर शिकविली जाते असे म्हटले आहे, तर ५ इतक्या अध्यापकांनी तृतीय स्तरावर शिकविली जाते असे म्हटले आहे. यावरून आपणास निश्चितपणे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतून मराठी हा विषय प्रथम स्तरावर शिकविला जात नाही हे स्पष्ट होते व हा विषय दुय्यम स्तरावर शिकविला जातो असे म्हणता येईल.

## ४.५] <u>इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी भाषेच्या अध्यापनाची उद्दिष्टे</u>-


अध्यापक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक ११ मध्ये ब ते फ मधील

प्रश्नाद्वारे इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील माध्यमिक स्तरावर शिकविल्या जाणाऱ्या मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे साध्य होतात काय हे जाणून घ्यावयाचे आहे. यासाठी या प्रश्नाची रचना बंदिस्त व मुक्त स्वरूपाची केलेली होती. प्रश्न क्रमांक ११.ब मध्ये मराठी भाषेच्या अध्यापनाची उद्दिष्टे साध्य होत असल्यास "होय" हा पर्याय ठेवावयाचा होता आणि उद्दिष्टे साध्य होत नसल्यास "नाही" हा पर्याय ठेवावा असे सांगितले होते. या पर्यायापैकी होय पर्याय असेल तर उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य होतात हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक ११.क ची योजना केली होती आणि नाही हा पर्याय असेल तर त्याची कारणे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक ११.ड ची योजना केलेली होती. त्या प्रश्नास आलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण पुढे दिलेले आहे.

सारणी क्रमांक ४.८.अ

मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे साध्य होण्याबाबतचे मत

| | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| उद्दिष्टे साध्य होतात | २२ | ८८ % |
| उद्दिष्टे साध्य होत नाहीत | ३ | १२ % |
| एकूण - | २५ | १०० % |




सारणी क्रमांक ४.८.अ वरून असे दिसून येते की, उद्दिष्टे साध्य होतात असे म्हणणा-यां अध्यापकांची संख्या ८८ % इतकी आहे, ही समाधानाची बाब आहे.

ही उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य होतात या प्रश्नाला दिलेला प्रतिसाद सारणी क्रमांक ४.८.ब मध्ये दिलेला आहे.

<u>सारणी क्रमांक ४.८.ब</u>

<u>मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे साध्य होण्याचे प्रमाण</u>

| प्रमाण | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| संपूर्णपणे | ४ | १६ % |
| ब-याच प्रमाणात | १० | ४० % |
| सांगता येत नाही | ४ | १६ % |
| अल्प प्रमाणात | ४ | १६ % |
| अजिबात नाही | ३ | १२ % |
| एकूण - | २५ | १०० % |



सारणी क्रमांक ४.८.ब वरून असे दिसून येते की, मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे संपूर्णपणे, तसेच ब-याचशा प्रमाणात साध्य होतात असे म्हणणा-या अध्यापकांची संख्या ५६ % आहे, तर अल्पप्रमाणात साध्य होतात असे म्हणणा-या अध्यापकांची संख्या शेकडा १६ आहे व सांगता न येणा-या अध्यापकांची संख्याही १६ % आहे, तर अजिबात साध्य होत नाहीत असे म्हणणारे ३ अध्यापक आहेत.

मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे साध्य होत नसल्यास त्याची कारणे जाणून घेण्यासाठी याच प्रश्नाच्या म्हणजे प्रश्न क्रमांक ११ च्या ड मध्ये पूर्वभागात कांही कारणे दिलेली होती व योग्य कारणापुढे ✓ अशी खूण करण्यास सांगितले होते. याशिवाय कांही कारणे असल्यास नमूद करण्यासही सांगितले होते. या प्रश्नास आलेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण पुढे दिलेले आहे.

<u>सारणी क्रमांक ४.८.क</u>

<u>मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे साध्य होत नसल्याची कारणे</u>

| अनुक्रम | कारण | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मातृभाषा मराठी नसते | ७ | २८ % |
| २ | शिक्षकाची अपूरी तयारी | २ | ८ % |
| ३ | संदर्भ साहित्य कमतरता | ५ | २० % |
| ४ | अध्यापन साहित्यातील अपूरेपणा | २ | ८ % |
| ५ | भाषेसाठी आवश्यक वातावरणाचा अभाव | ५ | २० % |
| ६ | कारणे न नोंदविणारे | ५ | २० % |
| | एकूण - | २५ | १०० % |

वरील कारणांशिवाय इतर कारणे पुढीलप्रमाणे सांगितलेली आहेत.

१] व्याकरणातील -हस्व, दीर्घ, विभक्ती, संधी, जोडाक्षरे, शब्दांची रूपे याबाबतचे किचकट नियम.

२] मराठीस गौण स्थान दिले जाते.

३. अध्यापनास अवधी कमी.

४. सराव फारच कमी असतो.

५. तासिका कमी असतात.

६. अध्यापन कला व भाषा समृध्दतेचा अभाव.

७. भाषेबद्दलची अभिरुची कमी.

८. कार्यभार जास्त असल्याने अध्यापनावर अवधान कमी.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी विषयाचे अध्यापन द्वितीय भाषा म्हणून केले जाते. प्रथम भाषा मराठी व द्वितीय भाषा मराठी यांच्या उद्दिष्टांमध्ये फरक आहे. म्हणून इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील अध्यापकांना द्वितीय भाषा मराठीची उद्दिष्टे माहित असतात काय हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक ११.इ ची योजना केलेली होती. त्यानुसार मराठी विषयाची द्वितीय भाषा म्हणून अध्यापनाची उद्दिष्टे माहित असणाऱ्या अध्यापकांची संख्या २० असून ती ८० टक्के इतकी आहे, व माहित नसणाऱ्यांची संख्या ५ असून ती २० टक्के इतकी आहे. वास्तविक १०० टक्के अध्यापकांना उद्दिष्टे माहित असणे गरजेचे आहे.

भाषेच्या अध्यापनातून कोणत्या प्रकारची उद्दिष्टे साध्य होतात हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्न क्रमांक ११.फ ची योजना केलेली होती. त्यामध्ये उद्दिष्टांचे प्रकार दिलेले होते. ज्या प्रकारची उद्दिष्टे साध्य होतात त्यापुढे ✓ अशी खूण करावयास सांगितले होते. त्यानुसार मिळालेला प्रतिसाद पुढील सारणी क्रमांक ४.८.ड मध्ये दिलेला आहे.

सारणी क्रमांक ४.८.ड

<u>मराठीच्या अध्यापनातून साध्य होणारी उद्दिष्टे</u>

| अनुक्रम | उद्दिष्ट प्रकार | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | ज्ञानात्मक | ६ | २४ % |
| २ | भाषात्मक | २ | ८ % |
| ३ | क्रियात्मक | - | - |
| ४ | तीनही प्रकारची | १७ | ६८ % |

सारणी क्रमांक ४.८.ड वरून असे दिसून येते की, तीनही प्रकारची उद्दिष्टे साध्य होतात असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या सर्वात जास्त म्हणजे १७ इतकी म्हणजे ६८ टक्के आहे. क्रियात्मक उद्दिष्टे साध्य होतात असे म्हणणारे अध्यापक मात्र एकही नाही, याचा अर्थ असा की मराठी भाषेच्या अध्यापनातून केवळ क्रियात्मक उद्दिष्टे साध्य होत नाहीत.

४.६] <u>मराठी विषयाचे अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी</u> -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाचे अध्यापन करताना कोणकोणत्या अडचणी येतात हे जाणून घेण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १२ ची योजना केलेली होती. हा प्रश्न बंदिस्त व मुक्त अशा संमिश्र स्वरूपाचा होता. या प्रश्नाच्या "अ" विभागात १६ अडचणी दिलेल्या होत्या. अध्यापकांनी अध्यापन करताना येणाऱ्या अडचणींपुढे ती अडचण येत असल्यास "होय" हा पर्याय ठेवावयाचा होता. मराठीचे अध्यापन करताना "अ" भागात दिलेल्या अडचणींव्यतिरिक्त अडचणी येत असल्यास त्याच प्रश्न क्रमांक १३ च्या "ब" विभागात नमूद कराव्यात असे सूचविले होते. प्रस्तुत प्रश्नास २४ अध्यापकांनी प्रतिसाद दिला आहे. प्रस्तुत प्रश्नाच्या पूर्वार्धात "अ" भागामध्ये दिलेल्या प्रतिसादांचे पुढील सारणी क्रमांक ४.९ मध्ये वर्गीकरण केले आहे.

<u>सारणी क्रमांक ४.९</u>

<u>इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीचे अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी</u>

| अनुक्रम | अडचणी | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | पुरेशा तासिका नाहीत. | १४ | १० |
| २ | अभ्यास बोजड आहे. | ७ | १७ |
| ३ | मराठी माध्यम नसल्यामुळे दुर्लक्ष करतात | १८ | ६ |
| ४ | मराठीसाठी इंग्रजीतून प्रतिशब्द द्यावे लागतात | १५ | ९ |
| ५ | संदर्भ ग्रंथ उपलब्ध होत नाहीत | १२ | १२ |


सारणी क्रमांक ४.१]

| अनुक्रम | अडचणी | होय | नाही |
|---|---|---|---|
| ६ | शिक्षकांचे माध्यम इंग्रजी असते | ७ | १७ |
| ७ | विद्यार्थी प्रतिसाद नसतो | ६ | १८ |
| ८ | मराठीचे पाठ्यपुस्तक किचकट आहे | ५ | १९ |
| ९ | विद्यार्थी शंका विचारत नाहीत | १७ | ७ |
| १० | मराठीचे व्याकरण, शुध्दलेखन, अनाकलनीय आहे | ९ | १५ |
| ११ | विद्यार्थी भाषांतर पध्दतीचा वापर करतात | १५ | ९ |
| १२ | विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे संभाषण कौशल्य कमी आहे. | १५ | ९ |
| १३ | विद्यार्थ्यांना मराठी भाषेविषयी आपुलकी नाही | १६ | ८ |
| १४ | विद्यार्थ्यांना मराठी भाषेची गरज व महत्व लक्षात येत नाही. | १८ | ६ |
| १५ | विद्यार्थ्यांना मराठी भाषेविषयी अभिरूची वाटत नाही. | ९ | १५ |
| १६ | विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिमान व श्रध्दा नाही. | ७ | १७ |

वरील सारणी क्रमांक ४.१ वरून अध्यापनात येणा-या अडचणींचा प्राधान्यक्रम खालीलप्रमाणे लावता येईल.

| | | |
|---|---|---|
| १] | मराठी माध्यम नसल्यामुळे दुर्लक्ष करतात | १८ |
| २] | विद्यार्थ्यांना मराठी भाषेची गरज व महत्व लक्षात येत नाही. | १८ |
| ३] | विद्यार्थी शंका विचारीत नाही | १७ |
| ४] | विद्यार्थ्यांना मराठीविषयी आपुलकी नाही | १६ |
| ५] | मराठीसाठी इंग्रजीतून प्रतिशब्द द्यावे लागतात | १५ |
| ६] | विद्यार्थी भाषांतर पध्दतीचा वापर करतात | १५ |

सारणी क्र. ४.५


इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीचे
अध्यापन करताना येणाऱ्या अडचणी
होय
नाही
क्ष अक्ष - अडचण क्रमांक
य अक्ष अध्यापक संख्या
२६
२४
२२
२०
१८
१६
१४
१२
१०
८
६
४
२
०
१
२
३
४
५
६
७
८
९
१०
११
१२
१३
१४
१५
१६

| | | |
|---|---|---|
| ७] | विद्यार्थ्यांमध्ये मराठीचे संभाषण कौशल्य कमी आहे | १५ |
| ८] | पुरेशा तासिका नाहीत | १४ |
| ९] | संदर्भ ग्रंथ उपलब्ध होत नाहीत | १२ |
| १०] | मराठीचे व्याकरण, शुध्दलेखन अनाकलनीय आहे | ९ |
| ११] | विद्यार्थ्यांना मराठी भाषेविषयी अभिरूची नाही | ९ |
| १२] | अभ्यास बोजड आहे | ७ |
| १३] | विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेविषयी अभिमान व श्रध्दा नाही | ७ |
| १४] | शिक्षकांचे माध्यम इंग्रजी असते | ७ |
| १५] | विद्यार्थी प्रतिसाद नसतो | ६ |
| १६] | मराठीचे पाठ्यपुस्तक किचकट आहे | ५ |

सारणी क्रमांक ४.९ वरून असे निदर्शनास येते की, अडचण क्रमांक ३, १४, ९, १३ या प्रमुख अडचणी दिसून येतात. तसेच अडचण क्रमांक १, ४, ५, ११, १२ या अडचणींही विचारात घेण्यासारख्या आहेत. कारण या अडचणी आहेत असे म्हणणा-या अध्यापकांची संख्या या अडचणी नाहीत असे म्हणणा-यांपेक्षा जास्त आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी खेरीज सर्व विषय इंग्रजी माध्यमातून शिकविले जात असल्यामुळे तेथे मराठी माध्यम नसते यामुळे विद्यार्थी मराठी विषयाच्या अध्यापनाकडे दुर्लक्ष करतात ही अडचण सर्वात जास्त अध्यापकांना जाणवते हे वरील सारणी क्रमांक ४.९ वरून लक्षात येते. तसेच विद्यार्थ्यांना मराठी भाषेची गरज व महत्व लक्षात न आल्यामुळे अध्यापनाकडे दुर्लक्ष करतात असेही बहुतांशी अध्यापकांचे म्हणणे आहे. विद्यार्थी न समजलेल्या पाठ्यांशा-विषयी शंका विचारत नाहीत त्यामुळे अध्यापनाला नेमकी दिशा कळत नाही असे कांही अध्यापक आपली अध्यापनाविषयीची अडचण सांगतात. या प्रमुख अडचणी असल्याचे ४.९ वरून समजते.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी विषयाबद्दल आपुलकी नाही त्यांना शिकविताना इंग्रजी प्रतिशब्द द्यावे लागतात. विद्यार्थी

भाषांतर पध्दतीने अध्ययन करतात. विद्यार्थ्यांमध्ये मराठीचे संभाषण कौशल्य कमी आहे. मराठी भाषेला अध्यापनासाठी पुरेशा तासिका नाहीत व संदर्भ ग्रंथ उपलब्ध होत नाहीत. या अडचणींचाही विचार होणे गरजेचे आहे कारण या अडचणी नोंदविणाऱ्या अध्यापकांची संख्या निम्म्यापेक्षा जास्त आहे. या अडचणी प्रयत्नपूर्वक दूर करणे आवश्यक आहे.

वर नमूद केलेल्या अडचणींव्यतिरिक्त कांही अडचणी असल्यास त्या नमूद करण्याविषयी याच प्रश्नाच्या उत्तरार्धात "ब" भागामध्ये सूचविले होते. त्याप्रमाणे अध्यापकांनी नमूद केलेल्या, त्यांना जाणविलेल्या अडचणी पुढीलप्रमाणे आहेत.

१] ज्या विषयात शिक्षक पदवीधर आहेत तेच विषय शिकविण्यास न दिल्यामुळे अध्यापनात अडचण येते.

२] विद्यार्थी अवांतर वाचन करत नाहीत, त्यामुळे भाषा, शब्दशैली, कल्पना, संदर्भ यांचा अभाव जाणवतो त्यामुळे निबंध, मुद्यावरून गोष्ट इत्यादी लेखनकार्यात अडचणी येतात.

३] मराठी विषयाच्या अध्ययनास जेवढा वेळ आवश्यक आहे तेवढा वेळ विद्यार्थी देत नाहीत. इतर विषयाकडे कल जास्त असतो.

४] पुढील शिक्षणात मराठी विषय असणार नाही या समजामुळे मराठी अध्ययनाकडे दुर्लक्ष करतात.

५] मराठी वर्तमानपत्रे, पुस्तके, व्याकरण पुस्तिका यांचा वापर कमी करतात.

६] इंग्रजी माध्यमाचा वापर असल्याने सराव कमी पडतो. उच्चस्तरावर अभिरूचीची जोपासना होत नाही.

वर अध्यापकांनी नमूद केलेल्या अडचणी त्यांच्याच शब्दात देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या अडचणी बऱ्याच प्रमाणात इंग्रजी माध्यमाचा परिणाम, अभिरूची अभाव, तासिका वेळ, संदर्भ पुस्तके, वृत्तपत्रे यांचा वाचनाचा अभाव,

मराठी विषयाकडे पाहण्याचा दृष्टीकोन, ग्रंथालय उपलब्धता, अवांतर वाचन, शब्दसामर्थ्य, सराव कमी, मराठी विषय असणा-यांनाच मराठी शिकविण्यास न दिल्याने होणारा परिणाम इत्यादी विषयासंदर्भात अध्यापकांना मराठी विषयाचे अध्यापन करताना अडचणी येतात असे दिसून येते.

४.७] मराठीचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी आवश्यक असणा-या बाबी :-

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीचे माध्यमिक स्तरावर अध्यापन करताना अध्यापन प्रभावी होण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी असाव्यात हे जाणून घेण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १३ ची योजना केलेली होती. हा प्रश्न बंदिस्त व मुक्त अशा संमिश्र स्वरूपाचा होता. प्रश्नाच्या पूर्वार्धात अध्यापन प्रभावी होण्यासाठी १४ बाबींची यादी दिलेली होती. त्यापैकी ज्या बाबींची शाळेत सोय आहे त्यापुढे ✓ अशी खूण करण्यास सांगितले होते व ज्या बाबींची सोय नाही पण हवी आहे असे वाटत असल्यास दुस-या स्तंभामध्ये ✓ अशी खूण करण्यास सांगितले होते. या व्यतिरिक्त आणखी काही बाबींची आवश्यकता असल्यास याच प्रश्नाच्या उत्तरार्धात नमूद करण्यास सांगितले होते. या प्रश्नाला दिलेला प्रतिसाद सारणी क्रमांक ४.१० मध्ये नोंदविला आहे. या प्रश्नाला २४ अध्यापकांनी प्रतिसाद दिला.

सारणी क्रमांक ४.१०

मराठीचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी आवश्यक असणा-या बाबी

| अनुक्रम | बाबी | सोय आहे | | सोय नाही पण हवी आहे | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | शे.प्रमाण | संख्या | शे.प्रमाण |
| १ | समृध्द ग्रंथालय | ९ | ३७ % | १५ | ६३ % |
| २ | दृकश्राव्य साधने | ७ | २८ % | १७ | ७१ % |
| ३ | मराठी वर्तमानपत्रे व नियतकालिके | १८ | ७५ % | ६ | २५ % |

सारणी क्रमांक ४.१०]-

| अनुक्रम | बाबी | सोय आहे | | सोय नाही पण हवी आहे. | |
|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | शे. प्रमाण | संख्या | शे. प्रमाण |
| ४ | विद्यार्थी वाचनालय | ३ | १२ % | २१ | ८८ % |
| ५ | अध्ययन सहलींचे आयोजन | १६ | ६७ % | ८ | ३३ % |
| ६ | क्षेत्रभेटीची संकल्पना | ३ | १२ % | २१ | ८८ % |
| ७ | मराठी विषयाचा कक्ष | २ | ५ % | २२ | ९५ % |
| ८ | मराठी विषयाची कृतिसत्रे | ६ | ६७ % | ८ | ३३ % |
| ९ | अंतर्गत मूल्यमापनाची सोय | १३ | ५४ % | ११ | ४६ % |
| १० | मराठी विषयाचे सहशालेय व अभ्यासपूरक उपक्रम | ८ | ३३ % | १६ | ६७ % |
| ११ | नवीन प्रकल्प राबविण्याची मूभा | ९ | ३७ % | १५ | ६३ % |
| १२ | हस्तलिखित अगर नियतकालिक प्रसिध्द करणे | ७ | २९ % | १७ | ७१ % |
| १३ | मराठी विषय शिक्षक मंडळ | ११ | ४६ % | १३ | ५४ % |
| १४ | मराठी-इंग्रजी शब्दकोश | १२ | ५० % | १२ | ५० % |

वरील सारणी क्रमांक ४.१० वरून असे लक्षात येते की, मराठी वर्तमानपत्रे व नियतकालिके यांची सोय आहे असे म्हणणा-या अध्यापकांची संख्या सर्वात जास्त म्हणजे ७५ % इतकी आहे. ही चांगली गोष्ट आहे. तसेच अध्यापन सहलींचे आयोजन करण्याची सोय आहे असे म्हणणा-या अध्यापकांची संख्या ६६.६ टक्के इतकी आहे ही बाबही चांगली आहे. मराठी विषयाचे सहशालेय, अभ्यासपूरक उपक्रम राबविण्याची सोय आणि मराठी-इंग्रजी शब्दकोश आहे असे म्हणणा-या अध्यापकांची संख्या ५० % पेक्षा जास्त आहे, ही सुध्दा उल्लेखनीय बाब आहे. मात्र यांची टक्केवारी वाढणे गरजेचे आहे.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत माध्यमिक स्तरावर मराठीचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी कांही बाबींची सोय नाही पण हवी आहे अशा बाबींमध्ये समृध्द ग्रंथालय, दृक-श्राव्य साधने, विद्यार्थी वाचनालय, क्षेत्रभेटीची संकल्पना, मराठी विषयाचा कक्ष, मराठी विषयाची कृतिसत्रे, अंतर्गत मूल्यमापनाची सोय, नवीन प्रकल्प राबविण्याची मूभा, हस्तलिखित व नियतकालिक प्रसिध्द करणे, मराठी शिक्षक मंडळ इत्यादी बाबींचा समावेश आहे. अशा सर्व सोयी हव्या आहेत असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या ५० % पेक्षा जास्त आहे.

मराठी विषयाचा स्वतंत्र कक्ष असावा असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या सर्वात जास्त म्हणजे ९५.० इतकी आहे. मराठी विषयासाठी स्वतंत्र कक्ष असावा त्यामध्ये चित्रे, तक्ते, आलेख, प्रतिकृती, भित्तीपत्रके, झलक चित्रे, व्याकरणविषयक नियम, सुविचार, सुभाषित संग्रह इत्यादी गोष्टी असतील तर मराठीच्या ज्ञानप्रसारणाचे कार्य व मराठीबद्दल आपुलकी व अभिरूची वाढण्यासही मदत होईल म्हणून असे मराठी विषय कक्ष असावेत असे वाटते.

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीचे अध्यापन प्रभावी व यशस्वी होण्यासाठी विद्यार्थी वाचनालयाची सोय नाही पण हवी आहे असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या ८७.५ टक्के आहे. मराठी वाचनाचा व लेखनाचा सराव करण्यासाठी विद्यार्थी वाचनालयाची सोय आवश्यक आहे. मुख्याध्यापकांनी ग्रंथपालांशी चर्चा करून ग्रंथालय समृध्द करून विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वाचनालयाची सोय करावी असे सुचवावेसे वाटते.

शाळेत वरीलपैकी ज्या सोयी हव्या आहेत असे अध्यापकांचे म्हणणे आहे त्या सर्व सोयी मुख्याध्यापक, व्यवस्थापक यांनी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न जरूर करावा की जेणेकरून विद्यार्थी-अध्ययन सुकर होईल व शिक्षकांसही ते अध्यापनास पूरक ठरेल व विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणण्यास मदत होईल.

या व्यतिरिक्त कांही गोष्टींची आवश्यकता असल्यास प्रश्न क्रमांक १३ च्या उत्तरार्धात नमूद करण्यास सांगितले होते. कांही अध्यापकांनी नमूद केलेल्या बाबी त्यांच्याच शब्दात पुढीलप्रमाणे मांडल्या आहेत.

१. ग्रंथालय आहे परंतु मराठीची पुस्तके कमी, मराठी ग्रंथसंपदा वाढवावी, मराठीची दर्जेदार पुस्तके, कथा, नाटके इत्यादी असावे.

२. वर्तमानपत्रे वाचण्यासाठी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र सोय असावी.

३. प्रत्येक वर्गात विद्युतची सोय असावी किंवा फिल्म दाखविण्यासाठी स्वतंत्र सोय [हॉल] असावा.

४. चित्रफिती, ध्वनीफिती, कॅसेट यांची सोय असावी.

५. आधुनिक तंत्रविज्ञानावर आधारित शैक्षणिक सुविधा असाव्यात.

६. सांघीक अध्यापन, क्षेत्रभेटी, पर्यवेक्षित अध्यापन यांना वाव द्यावा.

४.८] <u>मराठीचे अध्यापन करण्यासाठी इंग्रजी माध्यमाच्या शाळेत माध्यमिक स्तरावर वापरल्या जाणा-या पध्दती</u> :-

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाचे अध्यापन करताना मराठीचे अध्यापक कोणकोणत्या पध्दतींचा, किती वेळा वापर करतात हे जाणून घेण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १४ ची योजना केलेली होती. हा प्रश्न बंदिस्त व मुक्त असा संमिश्र स्वरूपाचा होता. या प्रश्नाच्या "अ" विभागामध्ये व्याख्यान, परिसंवाद, कथन, नाट्यीकरण, उद्गामी व अवगामी या पध्दती दिलेल्या होत्या. त्यांचा वापर किती वेळा करता येतो याचे प्रमाणही दिलेले होते. या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद पुढील सारणी क्रमांक ४.११ मध्ये नमूद केला आहे.

## सारणी क्रमांक ४.११

## मराठीच्या अध्यापन पध्दतींच्या वापराचे प्रमाण

| अ.क्र | अध्यापनपध्दती | नेहमी ८० % पेक्षा अधिक वेळा | ब-याच वेळा ६० ते ८० % | सर्व साधारण कधीकधी ४० ते ६० % | क्वचित ४० % पेक्षा कमी | कधीच नाही |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | व्याख्यान | १० | ७ | ५ | ३ | १ |
| २ | परिसंवाद | १ | २ | १० | २ | ३ |
| ३ | कथन | ७ | ६ | २ | २ | ४ |
| ४ | नाटयीकरण | २ | ३ | ८ | ३ | ६ |
| ५ | उद्गामी | २ | ३ | ६ | २ | ६ |
| ६ | अवगामी | - | ३ | ५ | ५ | ५ |

वरील सारणी क्रमांक ४.११ वरुन असे दिसून येते की, व्याख्यान व कथन पध्दतीचा जास्तीत जास्त उपयोग केला जातो. मराठी विषयाच्या अध्यापनासाठी या पध्दती वापरणे योग्यच आहे. नवीन पाठाची सुरुवात करताना, पाठविषयाबाबत कुतूहल निर्माण करताना, कठीण मुद्दे व तत्वे यांचे स्पष्टीकरण करताना, रसग्रहण पाठात विद्यार्थ्यांच्या भावनांना आवाहन करताना, पाठ्यपुस्तकात नसलेली माहिती विद्यार्थ्यांना देण्याकरता या दोन पध्दतींचा प्रामुख्याने उपयोग केला जात असावा असे वरील सारणी क्रमांक ४.११ वरुन लक्षात येते.

नाटयीकरण व परिसंवाद या पध्दतींचा कमी वेळा वापर केला जातो असे सारणी क्रमांक ४.११ वरुन दिसून येते. हेही योग्यच वाटते कारण पाठ्यपुस्तकातील मोजके पाठच नाटयीकरणास अगर परिसंवादास योग्य असतात कारण या पध्दतीचा वापर करावयाचे म्हटले तर वेळेचे बंधन असते, त्यामुळे मर्यादा पडतात तसेच इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी ही दुसरी

भाषा म्हणजे द्वितीय स्तरावर शिकविली जाते त्यामुळेही मर्यादा पडतात. त्यामुळे परिसंवाद पध्दती माध्यमिक स्तराऐवजी महाविद्यालयीन स्तरावर वापरणे अधिक उचित ठरते.

उद्‌गामी व अवगामी या दोन अध्यापन पध्दती विशेषत: व्याकरण अध्यापनासाठी वापरतात. मराठी विषयातील व्याकरणाचा भाग लक्षात घेता या पध्दतींचा वापर कमी वेळा होणे साहजिकच आहे असे वाटते. केवळ अवगामी अथवा केवळ उद्‌गामी पध्दतीचा वापर करण्यापेक्षा उद्‌गामी व अवगामी एकत्र पध्दती वापरणे अधिक श्रेयस्कर होते. म्हणजे उद्‌गामी पध्दतीने केलेले अध्यापन अवगामी पध्दतीने त्याचे उपयोजन होऊन दृढीकरण होते.

याच म्हणजे प्रश्न क्रमांक १४ च्या "ब" विभागामध्ये अध्यापकांना "अ" विभागात दिलेल्या अध्यापन पध्दती व्यतिरिक्त आणखी इतर कोणत्या पध्दतींचा वापर करत असल्यास त्याची नोंद करण्यास सांगितले होते. या प्रश्नास अल्प प्रतिसाद मिळाला. या नमूद केलेल्या पध्दतीमध्ये चर्चा पध्दती, पर्यवेक्षित अभ्यास पध्दती, स्पष्टीकरण पध्दती व प्रश्नोत्तर पध्दती यांचा समावेश आहे. वास्तविक पाहता या नमूद केलेल्या पध्दती स्वतंत्र अध्यापन नसून प्रश्न १४-अ मध्ये दिलेल्या पध्दतीमध्येच सामावलेल्या आहेत. उदा. चर्चापध्दती ही परिसंवाद पध्दतीचीच उपपध्दती आहे. तर स्पष्टीकरण पध्दती ही व्याख्यान पध्दतीमध्येच अंतर्भूत होते. पर्यवेक्षित अभ्यास पध्दती ही अध्यापनाची नव्हे तर अध्ययनाची पध्दती आहे. प्रश्नोत्तर पध्दती सर्व पध्दतीमध्ये थोडयाफार प्रमाणात असतेच.

प्रश्न क्रमांक १४ च्या "क" विभागामध्ये "ब" विभागात सुचविलेल्या इतर पध्दतींचा वापर करण्याची कारणे विचारलेली होती. त्यास मिळालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे.

१. निबंधलेखनाच्या अध्यापनासाठी चर्चापध्दती उपयोगी पडते.

२. पर्यवेक्षित अभ्यास पध्दतीमुळे विद्यार्थ्यांना विचार करण्याची सवय लागते स्वतंत्रपणे विचार करून कल्पनाशक्ती विकसित होते. वाचनकक्षा रुंदावते.

३. स्पष्टीकरण पध्दतीमुळे विद्यार्थ्यांना आकलन चांगले होते.

४. प्रश्नोत्तर पध्दतीचा वापर केल्यामुळे विद्यार्थी विचार करून स्वत:च्या भाषेत उत्तरे देतात त्यामुळे विद्यार्थ्यांना मराठी भाषेतील वाक्यरचना चांगल्या रितीने करता येतात.

एखादा घटक शिकविण्यासाठी एखादी पध्दती विशेष परिणामकारक असूनही त्या पध्दतीचा वापर करता येत नाही असा अनुभव अध्यापकांना येतो काय ? हे जाणून घेण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीमधील प्रश्न क्रमांक १४ च्या "ड" विभागात योजना केली होती हा प्रश्न बंदिस्त स्वरूपाचा असून असा अनुभव येत असल्यास "होय" आणि येत नसल्यास "नाही" हा पर्याय ठेवण्यास सांगितले होते. या प्रश्नास दिलेला प्रतिसाद पुढील सारणी क्रमांक ४.१२ मध्ये नोंदविलेला आहे.

<u>सारणी क्रमांक ४.१२</u>

<u>परिणामकारक पध्दतीचा वापर करता येण्याविषयीचा अनुभव</u>

| अनुक्रम | पर्याय | अध्यापक | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | परिणामकारक पध्दतीचा वापर करता येत नाही असा अनुभव | १४ | ५६ % |
| २ | परिणामकारक पध्दतीचा वापर करता येतो असा अनुभव | ९ | ३६ % |
| ३ | प्रतिसाद न देणारे | २ | ८ % |

वरील सारणीवरून असे दिसून येते की ५६ % अध्यापकांच्या मते एखादी पध्दती परिणामकारक असूनही तिचा उपयोग करता येतो, म्हणजे अध्यापेक्षा अधिक शिक्षकांना अध्यापनपध्दती परिणामकारक आहे हे माहित असूनसुध्दा तिचा उपयोग करता येऊ नये ही बाब फारशी चांगली नाही. सबब त्यांना असे कां करता येऊ नये हे जाणून घेण्यासाठी याच प्रश्नाच्या "इ" विभागात यासंबंधी विचारणा केलेली होती. या प्रश्नाला दिलेला

प्रतिसाद त्यांच्याच शब्दात पुढे दिला आहे.

१] शाळेत पुरेशा सोयी नाहीत.

२] नाट्यीकरण पध्दतीचा वापर करण्यास वेळ नसतो.

३] नाट्यीकरण पध्दतीमध्ये सर्वच विद्यार्थी सहभागी होत नाहीत.

४] नाट्यीकरण, परिसंवाद या पध्दतीचा वापर करण्यास तासिका अपु-या पडतात.

५] या पध्दतीचा वापर केल्यास अभ्यासक्रम पूर्ण होत नाही.

६] व्यवस्थापनाचे नियम पध्दतीचा अवलंब करण्यास अडथळा करतात

७] इतर सहकारी विषय शिक्षकांचे सहकार्य मिळत नाही.

८] विषयतज्ञ मार्गदर्शक उपलब्ध होत नाहीत.

९] तीनही भाषांचे व्याकरण एकाच पध्दतीने व एकाचवेळी शिकविण्यामध्ये एकवाक्यता नाही.

१०] रेडिओ, टी.व्ही. सारखी शैक्षणिक साधने शाळेत उपलब्ध होत नाहीत.

११] दृकश्राव्य साधने, तक्ते इत्यादी अपुरे आहेत.

१२] मर्यादित तासिकांमुळे सविस्तर व सखोल अध्यापन करता येत नाही.

१३] ऐतिहासिक, पौराणिक पाठाच्या अध्यापनाचे वेळी उत्सुकता, जिज्ञासा निर्माण होत नाही.

वरील दिलेल्या प्रतिसादावरून असे दिसून येते की, नाट्यीकरण, परिसंवाद पध्दतींचा वेळेअभावी वापर करता येत नाही याचे कारण अपु-या मर्यादित तासिका, शैक्षणिक साधनांची उपलब्धता कमी, विद्यार्थी सहभाग कमी, व्यवस्थापनाचे दडपण, विषय शिक्षकांचे सहकार्य कमी इ. नाट्यीकरण पध्दतीचा वापर करण्यास सलग दोन तासिका असाव्यात. विद्यार्थ्यांना सहभाग घेण्यास प्रवृत्त केले पाहिजे. प्रोत्साहन दिले पाहिजे. अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी शिक्षकांची असल्यामुळे या पध्दतीचा वापर करता येत नाही हे कारण संयुक्तिक वाटते. मात्र तरी सुध्दा शिक्षकांनी महिन्या-दोन महिन्यातून या पध्दतीचा उपयोग करून अध्यापन करावे असे

सुचवावेसे वाटते. म्हणजे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळेल व मराठी विषयाची गोडी वाढविण्यास हातभार लागेल. शाळेने व व्यवस्थापनाने शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तसेच विद्युतची सोयही करुन दिली पाहिजे. म्हणजे अध्यापन पध्दतींचा वापर करण्यामध्ये अध्यापकांना काही अडचण राहणार नाही.

४.९] <u>मराठीच्या पद्य विभागाचे अध्यापन</u> -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत माध्यमिक स्तरावर मराठीचे अध्यापन करताना कवितांचे अध्यापन नेमक्या कोणत्या पध्दतीने केले जाते व कवितेचे अध्यापन करताना कोणत्या अडचणी येतात हे जाणून घेण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १५.अ ची योजना केलेली होती. हा प्रश्न मुक्त स्वरूपाचा होता. याच प्रश्नाच्या "ब" भागामध्ये या अडचणींचे निराकरण कशाप्रकारे करता येईल याबाबत विचारणा केलेली होती. कवितांचे अध्यापन करताना येणा-या अडचणी व त्या अडचणींवर त्यांनीच सुचविलेले उपाय त्यांच्याच शब्दात पुढीलप्रमाणे आहेत.

<u>कवितेचे अध्यापन करताना येणा-या अडचणी</u> -

१] कवितेतील भावात्मक आशय स्पष्ट करताना अडचणी येतात.

२] कवितेचा संदर्भ पाहण्यासाठी संदर्भ साहित्याचा अभाव असतो.

३] कविता लिहिण्यामागील कवीच्या भावना संदिग्ध असतात.

४] कवीच्या भावना हुबेहुब सांगता येत नाहीत.

५] विद्यार्थ्यांची बौध्दिक पातळी कमी असते. त्यामुळे केलेले विवेचन स्पष्टीकरण निरर्थक ठरते. परंतु संपूर्णपणे स्पष्टीकरण केल्याशिवाय अध्यापन अपूरे वाटते.

६] कांही कवीकल्पना विद्यार्थ्यांना पटत नाहीत त्यामुळे रसास्वाद घेता येत नाही.

७] कवितांना वेगवेगळया चाली लावता येत नाहीत.

८] कांही कविकल्पना क्लिष्ट असतात.

९] कवितांच्या ओळीत अर्थापेक्षा गर्भितार्थ वेगळा असतो तो स्पष्ट करताना अडचण येते.

१०] कवितेतील कांही शब्द नेहमीपेक्षा वेगळेच असतात. त्यामुळे त्याची रचना व अर्थ लावता येत नाही व अर्थ लक्षात येत नाही.

११] विद्यार्थी कवितांचे पाठांतर करत नाहीत.

१२] इंग्रजी माध्यम असल्याने कवितेतील शब्दांचे मराठीतून दिलेले अर्थ समजत नाहीत.

१३] कवी कल्पना, त्यांची सांकेतिक भाषा व संतकाव्य यांचे अध्यापन करताना अडचणीचे होते.

१४] कवितेतील अलंकार, वृत्त समजत नाहीत.

१५] कवितेच्या अध्ययनाच्या दृष्टीने आकलनक्षमता कमी असते.

१६] इंग्रजी माध्यम असल्याने इंग्रजी प्रतिशब्द द्यावा लागतो, मात्र तो नेमका अर्थवाही असेलच असे नाही.

१७] कवितेच्या ध्वनिफिती नसतात.

१८] विद्यार्थी कवितेचे रसग्रहण स्वत:च्या भाषेत करत नाहीत.

१९] इंग्रजी माध्यम असल्याने विद्यार्थी प्रश्नाचे उत्तर देताना स्वत:च्या भाषेत न देता कवितेच्या ओळीत सांगतो.

अध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादावरून असे लक्षात येते की, कवितेच्या अध्यापनामध्ये कवितेमागील संदर्भ, कल्पना, संतकाव्य अध्यापनाविषयी, चालीविषयक, गेयतेविषयी, इंग्रजी प्रतिशब्द देण्याबाबत, काव्याविषयी गोडी निर्माण होण्याबाबत आणि कवितेतील अलंकार वृत्ताबाबत अडचणी असल्याचे लक्षात येते.

<u>प्रश्न क्रमांक १५ च्या "अ" विभागात दिलेल्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी अध्यापकांनी सूचविलेले उपाय</u> –

१] कवितेच्या अध्यापनास पूरक व संदर्भ साहित्याचा वापर करावा.

२] कवी-परिचयात कवीच्या कविता लिहिण्यामागील भावना स्पष्ट केलेल्या असाव्यात.

३] निसर्गवर्णनपर कवितांचे अध्यापन प्रत्यक्ष निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन करण्याची संधी मिळावी.

४] कवीच्या प्रत्यक्ष भेटी आयोजित कराव्यात.

५] कांही कवीकल्पना विद्यार्थ्यांना कशा स्पष्ट करून द्याव्यात यांचे स्पष्टीकरण कवीपरिचयात अथवा कवितेखाली द्यावे.

६] कवीकल्पना, त्यातील शब्दसौन्दर्य, कल्पना सौन्दर्य त्यांच्या पातळीवर जाऊन स्पष्ट करावे.

७] कवितांना चाली लावून त्याचे टेप करावे व टेपरेकॉर्डरचा वापर करावा.

८] काव्यवाचनाची आवड निर्माण करावी.

९] काव्यवाचनास प्रोत्साहन देऊन प्रवृत्त करावे.

१०] शिक्षकांनी कवितांना चाल लावून म्हणून दाखवावी. कविता म्हणण्याची विद्यार्थ्यांना संधी द्यावी म्हणजे कवितेचे पाठांतर करण्याची आवड निर्माण होईल.

११] इंग्रजी माध्यम असल्याने अपरिचित शब्दांचे अर्थ मराठीत तसेच त्यांस प्रतिशब्दही द्यावेत.

१२] संतसाहित्याचे वाचन करावे, संदर्भ ग्रंथांचा व कोषांचा वापर करावा असे साहित्य उपलब्ध करून द्यावे.

१३] कवितेतील अलंकार व वृत्त शोधण्यासाठी व्याकरणविषयक पुस्तकांचा अभ्यास करून त्यांच्या लक्षणावरून ते ओळखणे सुलभ जाते.

१४] विद्यार्थ्यांची वाचनक्षमता वाढवावी. वाचनाची गोडी वाढवावी. विद्यार्थ्यांसाठी खास वाचनकक्षाची सोय करून द्यावी. ही वाचनाची सवय प्राथमिक स्तरावरच लावावी.

१५] कवितेच्या ध्वनीफिती उपलब्ध करून द्याव्यात.

१६] विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढवावी, वाक्यरचना, लेखन, भाषण, यातून सुधारावी यासाठी योग्य मार्गदर्शन व सराव द्यावा.

१७] इंग्रजी माध्यम असल्याने विद्यार्थ्यांना मराठी वाक्यरचना करण्याचा सराव कमी पडतो म्हणून अध्यापनात बरेच छोटेमोठे प्रश्न विचारून त्यांची उत्तरे स्वतः:च्या भाषेत योग्य वाक्यरचना करून देण्यास प्रवृत्त करावे.

कवितेच्या अध्यापनात येणाऱ्या अडचणींच्या निराकरणासाठी मराठीच्या अध्यापकांनी सुचविलेले उपाय स्वागतार्हच आहेत.

४.१०] <u>मराठीच्या व्याकरणाचे अध्यापन</u> :-

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत माध्यमिक स्तरावर मराठीचे अध्यापन करताना, व्याकरणाचे अध्यापन करताना कोणत्या अडचणी येतात हे जाणून घेण्यासाठी अध्यापकांच्यासाठी तयार केलेल्या प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १६ ची योजना केलेली होती. या प्रश्नाच्या "अ" भागामध्ये अडचणी नमूद करण्यास सांगितल्या होत्या व "ब" भागामध्ये त्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी उपाय सुचविण्यास सांगितले होते. मराठी विषयाच्या अध्यापकांनी या मुक्त प्रश्नास दिलेला प्रतिसाद त्यांच्याच शब्दात पुढील-प्रमाणे आहे.

<u>मराठी व्याकरणाचे अध्यापन करताना येणाऱ्या समस्या</u> -

१] इंग्रजी माध्यम असल्याने मराठीचे व्याकरण क्लिष्ट वाटते. विद्यार्थी अध्यापनाकडे लक्ष देत नाहीत. केवळ प्रश्नांच्या उत्तरापुरताच अभ्यास करतात.

२] विद्यार्थ्यांना व्याकरणाविषयी अभिरूची नाही. त्यामुळे व्याकरण किचकट वाटते.

३] विद्यार्थ्यांना व्याकरणाचे महत्व समजत नाही.

४] प्रत्येक नवीन घटक शिकविण्यापूर्वी मागील घटकाची उजळणी घ्यावी लागते.

५] व्याकरणविषयक शैक्षणिक साहित्य नाही.

६] व्याकरणासाठी पुरेशा तासिका नाहीत.

७] इंग्रजी प्रतिशब्द द्यावे लागतात. इंग्रजी माध्यमामुळे वाक्यरचना करताना अडचण येते. कर्ता, कर्म, क्रियापद यांचा क्रम चुकतो.

८] व्याकरणाच्या नियमाखेरीज अपवाद असतात ते समजत नाहीत, लक्षात राहत नाहीत.

९] इंग्रजी माध्यम असल्याने लिपीमध्ये बदल असल्याने व्याकरणविषयक चुका होतात.

१०] विद्यार्थी शंका विचारत नाहीत.

११] विद्यार्थी व्याकरणाकडे विशेष लक्ष देत नाहीत.

१२] वर्षाच्याशेवटी व्याकरणास वेळ दिला जातो.

१३] व्याकरणाच्या तासिका मोठ्या सुट्टीनंतर असल्याने विद्यार्थी दुर्लक्ष करतात.

१४] प्राथमिक स्तरावर व्याकरणाकडे दुर्लक्ष झाल्याने माध्यमिक स्तरावर अध्यापन करताना पुन्हा प्राथमिक स्तरावरील व्याकरणाचे अध्यापन करावे लागते. त्यामुळे वेळ अपुरा पडतो.

वरील प्रतिसादावरून असे दिसून येते की, अध्यापकांच्या व्याकरण अध्यापनाच्या अडचणी मुख्यत: व्याकरणाच्या क्लिष्टतेच्या व रूक्षतेच्या गैरसमजूतीबाबत, आवड, अभिरूची नसल्याबाबत, वेळेचा अपुरेपणा, दृढीकरणाचा अभाव, इंग्रजी माध्यमामुळे मराठीचा सराव कमी, लिपीचा बदल, पाठांतराबाबत, इत्यादी बाबतीत अडचणी नमूद केलेल्या आहेत.

प्रश्न क्रमांक १६-ब च्या उत्तरावरून मराठी विषयाच्या अध्यापकांना येणा-या सर्वसामान्य अडचणी व त्यावर सुचविलेले उपाय -

१] इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठीच्या व्याकरणाची उपयुक्तता व गरज पटवून द्यावी. व्याकरणाने भाषेला येणारे सौन्दर्य पटवून द्यावे.

२] आकर्षक पध्दतीने अध्यापन करून व्याकरणाविषयी गोडी वाढविता

येईल.

३] व्याकरणामध्ये गणितासारखे सर्वच्या सर्व गुण मिळतात हे पटवून द्यावे.

४] मागील घटकावर प्रश्न विचारून विद्यार्थ्यांची उजळणी घेऊन पुढील घटकाचे अध्यापन करावे.

५] शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या मदतीने कांही तक्ते, व्याकरणविषयक शैक्षणिक साधने तयार करून अध्यापन करावे.

६] कार्यात्मक व्याकरणानुसार व्यवहारातील विविध उदाहरणे देऊन हसत खेळत अध्यापन करावे.

७] व्याकरण म्हणजे मूळ पाया असल्यामुळे व्याकरणासाठी स्वतंत्र जादा तासिका असाव्यात.

८] मराठी भाषेचा सराव अधिक झाला पाहिजे. व्याकरणाविषयी पालकांचा गैरसमज दूर केला पाहिजे.

९] विद्यार्थ्यांना इंग्रजी व मराठी लिपीतील फरक लक्षात आणून दिला पाहिजे.

१०] विद्यार्थ्यांना दडपण न देता लोकशाही तत्वाचा अवलंब करून अध्यापन केल्यास विद्यार्थी शंका विचारून व्याकरणात प्रगती करतील.

११] व्याकरणाचे तास नियमित असावेत, अधूनमधून चाचणी घ्यावी.

१२] व्याकरणाच्या तासिका मध्यंतरापूर्वी असाव्यात.

१३] शिक्षकाने व्याकरण अध्यापनात विद्यार्थ्यांना परिचित अशी उदाहरणे देऊन पाठाकडे आकर्षित करून घेतले पाहिजे.

१४] व्याकरणविषयक तक्ते वर्गात लावलेले असावेत.

१५] प्राथमिक स्तरावर व्याकरणाचे अध्यापन पूर्णत: व्हावे व त्याचे दृढीकरण करण्यात यावे.

१६] प्राथमिक स्तरावर व्याकरणाचा पाया भक्कम केला पाहिजे.

वरील प्रतिसादावरून असे दिसून येते की, व्याकरणविषयक गैरसमजूती दूर करणे, माध्यमाचा प्रश्न असल्याने मराठीच्या व्याकरणाकडे होणारे

दुर्लक्ष टाळणे, सोपी व विद्यार्थ्यांच्या जीवनातील विविध उदाहरणे देणे, आकर्षण पध्दतीने, शैक्षणिक साधनांचा वापर करून अध्यापन करणे, प्राथमिक स्तरावर पाया भक्कम करणे, नियमितपणे व्याकरणासाठी तासिका ठेवणे इत्यादी उपाय सुचविलेले आहेत ते योग्यच आहेत.

४.११] मराठीतील निरनिराळ्या लेखन प्रकारांचे अध्यापन -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीचे अध्यापन करताना अत्यंत दुर्लक्षित असे अध्यापन कोणत्या बाबीचे होत असेल तर ते लेखनप्रकाराचे. वास्तविक लेखन कौशल्यांचा विकास करणे हे भाषा अध्यापनाचे महत्वाचे उद्दिष्ट मानले तर लेखनप्रकाराच्या अध्यापनाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. म्हणून लेखनप्रकाराचे अध्यापन करताना अध्यापकांना येणा-या अडचणी जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक १७ - अ ची योजना अध्यापक प्रश्नावलीमध्ये केलेली होती आणि या अडचणींचे निराकरण कसे करता येईल याबाबत याच प्रश्नाच्या "ब" भागामध्ये विचारणा केलेली होती. हा प्रश्न मुक्त स्वरूपाचा होता. या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद अध्यापकांच्या शब्दामध्येच नमूद केलेला आहे.

लेखनप्रकाराचे अध्यापन करताना येणा-या अडचणी -

१] विद्यार्थ्यांचे मराठीचे अवांतर वाचन कमी असते. त्यामुळे कल्पना, विचार व विषयविस्तार करण्यावर अधिक भर द्यावा लागतो.

२] वाक्यरचना, शुध्दलेखन, व शब्दसामर्थ्य यांचा अभाव असतो.

३] लेखनात अशुध्दता फार असते.

४] लेखनात अशुध्दतेबरोबरच हस्ताक्षराची अडचण येते.

५] इंग्रजी माध्यम असल्याने मराठी विषयाकडे विशेषत: लेखनप्रकाराकडे दुर्लक्ष होते. लिंग, वचन, विभक्ती याबाबतीत वाक्यरचना सदोष असते. निबंध, पत्र इत्यादी प्रकारची तंत्रे, मायना यामध्ये चुका होतात.

६] निबंधादी लेखनप्रकाराचे अध्यापन एकतर्फी होते म्हणून शिक्षक लिहून देतात.

७] ऱ्हस्व दीर्घ उच्चारानुसार लिहित नाहीत. प्राथमिक स्तरावर विद्यार्थी कच्चा असतो.

८] विद्यार्थ्यांना कल्पना व विचार सुचतात पण त्यांची मांडणी करता येत नाही.

९] विरामचिन्हांचा अचूक वापर करता येत नाही.

१०] लेखनप्रकारासाठी स्वतंत्र तासिका नसतात.

११] विद्यार्थी सहभाग व प्रतिसाद कमी असतो.

१२] लेखनप्रकाराचे मुद्दे शिक्षकांनाच द्यावे लागतात.

वरील प्रतिसाद पुनरावृत्ती टाळून एकत्रीत केलेले आहेत. लेखन-प्रकाराच्या अध्यापनामध्ये प्रामुख्याने शुध्दलेखन, वाक्यरचना, विरामचिन्हे, हस्ताक्षर, स्वत:हून विचार करण्याची प्रवृत्ती, मुद्यानुसार मांडणी, विद्यार्थी सहभाग इत्यादीबाबतीत अडचणी असल्याचे वरील प्रतिसादावरून लक्षात येते.

<u>प्रश्न क्रमांक १७ च्या ब भागामध्ये अध्यापकांनी लेखन-प्रकाराच्या अध्यापनात येणा-या अडचणींच्या निराकरणार्थ सुचविलेल्या उपाय-योजना</u> -

१] मराठीच्या अवांतर वाचनास प्रेरणा द्यावी. निबंधासारखी पुस्तके उपलब्ध करून द्यावीत.

२] वाक्यरचना, शुध्दलेखन, व शब्दसामर्थ्य विकासासाठी प्रयत्न झाला पाहिजे. वाचनक्षमता विकसित करावी.

३] नियमितपणे शुध्दलेखनाचा सराव द्यावा व तो नियमितपणे तपासला जावा.

४] अक्षर सुवाच्य व सुंदर येण्यासाठी व शुध्दलेखनाच्या नियमानुसार लिहिण्याचा सराव करण्याच्या कामी पालकांनीही मार्गदर्शन करावे. नियमितपणे पाल्याकडून सराव करून घ्यावा.

५] वर्गामध्ये वारंवार निबंध, पत्र, कथा, मुद्यावरून गोष्ट इत्यादी

लेखनप्रकारावर भर द्यावा. निबंधावर वर्गात चर्चा करावी. नंतर लिहून झाल्यावर तपासून योग्य त्या दुरूस्त्या करून द्याव्यात. वैयक्तिक लक्ष द्यावे.

६] निबंधादि लेखनप्रकार लिहून न देता त्यावर चर्चा करावी व विद्यार्थ्यांना स्वत:च्या कल्पनेने वाक्यरचना करून लिहिण्यास प्रवृत्त करावे.

७] -हस्व दीर्घ उच्चारानुसार लिहिण्यावर भर असावा यासाठी प्राथमिक स्तरावर भर देणे गरजेचे आहे.

८] लेखनप्रकारानुसार मुद्दे देवून त्यावर चर्चा व स्पष्टीकरण करावे व योग्य मांडणी करण्यास प्रोत्साहन द्यावे.

९] विरामचिन्हांची दखल घेऊन वाचण्याची व लिहिण्याची सवय लावावी. यासाठी छोटी छोटी पुस्तके वाचण्यास उपलब्ध करून द्यावीत.

१०] अध्यापकांनी असलेल्या तासिकांपैकी आठवडयातून एक तासिका लेखनविकासासाठी ठेवावी.

११] चित्रफिती, आदर्श लेखनप्रकाराचे नमूने विद्यार्थ्यांसमोर ठेवून त्यांना प्रोत्साहित करावे व प्रतिसाद मिळवावा.

१२] एखाद्या निबंधाचे मुद्दे शिक्षकांनी दिले तर दुस-या निबंधाचे मुद्दे विद्यार्थ्यांना काढण्यास उद्युक्त करावे. त्यांच्या विचारशक्तीला व कल्पनाशक्तीला आवाहन करावे.

अध्यापकांनी अवांतर वाचन, लेखनाचा सराव, शुध्दलेखनात होणा-या चुकांची दुरूस्ती, लेखनामध्ये स्वत:च्या भाषेत मांडणी करणे यावर उपाययोजना सुचविताना भर दिलेला दिसून येतो. अध्यापकांनी सुचविलेले उपाय स्वयंस्पष्ट व स्वागतार्ह आहेत. निबंधलेखनाच्या अध्यापनाबाबत शिफारशी सुचविताना अध्यापकांनी वर दिलेल्या प्रतिसादात्मक सूचनांचा सम्यक विचार केलेला आहे.

४.१२] मराठीच्या अध्ययन-अध्यापना विषयीचा दृष्टीकोन :-

४.१२.अ] मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयीचा विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांचा मराठी विषयाच्या

अध्ययन-अध्यापनाविषयीचा दृष्टीकोन जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक १८ ची योजना केलेली होती. मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयी विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन उपेक्षेचा दिसून येत असल्यास "होय" हा पर्याय ठेवावा, अन्यथा "नाही" हा पर्याय ठेवावा असे सांगितले होते. प्रस्तुत प्रश्नास दिलेल्या प्रतिसादाचे सारणी क्रमांक ४.१३.अ मध्ये वर्गीकरण केले आहे.

सारणी क्रमांक ४.१३.अ

विद्यार्थ्यांचा मराठी विषयाच्याबाबतचा दृष्टीकोन

| दृष्टीकोन | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १] मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयीचा विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन उपेक्षेचा आहे. | ६ | २४ % |
| २] मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयीचा विद्यार्थ्यांचा दृष्टीकोन उपेक्षेचा नाही. | १८ | ७२ % |
| ३] प्रतिसाद न देणारे | १ | ४ % |
| एकूण - | २५ | १०० % |

४.१२.ब] इंग्रजी माध्यमातील शाळेतील मराठीच्या अध्ययन-अध्यापना विषयीचा पालकांचा दृष्टीकोन -

इंग्रजी माध्यमातील शाळेतील मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयीचा पालकांचा दृष्टीकोन उपेक्षेचा आहे काय हे जाणून घेण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक १९ ची योजना केलेली होती. मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयी पालकांचा दृष्टीकोन उपेक्षेचा असल्यास "होय" पर्याय ठेवावा अन्यथा "नाही" पर्याय ठेवावा असे सांगितले होते. त्या प्रश्नास मिळालेल्या प्रतिसादाचे वर्गीकरण ४.१३.ब मध्ये केलेले आहे.

सारणी क्रमांक ४.१३.ब

मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयीचा पालकांचा दृष्टीकोन

| पालकांचा दृष्टीकोन | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयीचा पालकांचा दृष्टीकोन उपेक्षेचा आहे. | ७ | २८ % |
| २. मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयीचा पालकांचा दृष्टीकोन उपेक्षेचा नाही. | १७ | ६८ % |
| ३. प्रतिसाद न देणारे | १ | ४ % |
| एकूण - | २५ | १०० % |

४.१२.क] इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी विषयाच्या अध्ययन-अध्यापनाविषयीचा व्यवस्थापकांचा दृष्टीकोन -

प्रश्न क्रमांक २० मध्ये व्यवस्थापनामध्ये येणारे प्राचार्य/मुख्याध्यापक, संचालक/अध्यक्ष, इ.घटकांचा इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी विषयाच्या अध्ययन-अध्यापनाबाबतचा दृष्टीकोन जाणून घेण्याचा उद्देश होता. दृष्टीकोन उपेक्षेचा असल्यास 'होय' असा पर्याय ठेवण्यास सांगितले होते. त्यानुसार अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद सारणी क्रमांक ४.१३.क मध्ये नोंदविला आहे.

सारणी क्रमांक ४.१३.क

मराठीच्या अध्ययन-अध्यापनाबाबत व्यवस्थापकांचा दृष्टीकोन

| दृष्टीकोन | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|
| १. मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयी व्यवस्थापकांचा दृष्टीकोन उपेक्षेचा आहे. | २ | ८ % |
| २. मराठीच्या अध्ययन-अध्यापनाविषयी व्यवस्थापकांचा दृष्टीकोन उपेक्षेचा नाही. | २० | ८० % |
| ३. प्रतिसाद न देणारे | ३ | १२.०० |
| एकूण - | २५ | १०० % |

प्रश्न क्रमांक १८, १९, २० च्या उत्तरार्धात विद्यार्थी, पालक व व्यवस्थापक यांचा मराठीच्या अध्ययन-अध्यापनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन उपेक्षेचा दिसून येत असल्यास त्यांची कारणे नमूद करण्यास सांगितले होते. अध्यापकांनी दिलेल्या प्रतिसादातील कारणे त्यांच्याच शब्दात पुढीलप्रमाणे आहेत.

१] इंग्रजी माध्यमाची शाळा असल्याने इंग्रजी विषयाचे महत्व जास्त आहे.

२] आज काल सर्वच पालकवर्ग व विद्यार्थी वर्ग यांचा कल शास्त्र शाखेकडे जास्त असल्याने मराठी विषयाकडे पाहण्याचा दृष्टिकोन उपेक्षेचा आहे.

३] मराठी विषय हा महत्वाचा विषय मानत नाही त्या विषयात केवळ पास होणे हेच कर्तव्य समजतात.

४] मराठी विषय सोपा आहे असे समजून त्याकडे जास्त तयारी न करता, लेखन कमी झाल्याने दुर्लक्ष होते.

५] पाल्य इंग्रजी माध्यमाच्या शाळेत आहे त्याने इंग्रजी बोलले पाहिजे. मराठी नीट बोलता आले नाही तरी त्याची पालकांना चिंता वाटत नाही. इंग्रजी शुध्द बोलता आले नाही तरी त्याचा मात्र पालकांना अभिमान वाटतो.

वरील सारणी क्रमांक ४.१३.अ, ४.१३.ब, ४.१३.क यावरून असे दिसून येते की मराठीच्या अध्ययन-अध्यापनाकडे पाहण्याचा विद्यार्थ्यांचा, पालकांचा व व्यवस्थापकांचा दृष्टिकोन उपेक्षेचा नाही ही समाधानाची बाब आहे. काही अध्यापकांनी नमूद केलेल्या उपेक्षेच्या कारणावरून असे वाटते की, मराठी भाषा द्वितीय स्तरावर अभ्यासली जात असल्यामुळे आणि मोठ्या प्रमाणात मराठी सोपी भाषा आहे असा असलेला गैरसमज व इंग्रजी भाषेला दिलेले अवास्तव महत्त्व ही कारणे प्रामुख्याने उपेक्षा करण्यापाठीमागे दिसून येतात.

४.१३] मराठीच्या अध्यापनात इंग्रजी माध्यमाचा परिणाम :-

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयांचे अध्यापन करत असताना काय परिणाम होतो हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रश्न क्रमांक २१, २२, २३ या प्रश्नांची योजना केलेली होती.

प्रश्न क्रमांक २१.अ मध्ये मराठीचे अध्यापन करताना इंग्रजी माध्यमाची अडचण निर्माण होते काय ? हे जाणून घेण्यासाठी विचारणा केलेली होती. अडचण निर्माण होत असल्यास 'होय' हा पर्याय ठेवावा व अडचण येत नसल्यास 'नाही' हा पर्याय ठेवावा असे सांगितले होते आणि २१.ब मध्ये जर होय पर्याय असेल तर ती अडचण कोणत्या स्वरूपाची असते अशी विचारणा केलेली होती. हा प्रश्न बंदिस्त व मुक्त अशा संमिश्र स्वरूपाचा होता. प्रश्न २१.अ मध्ये मिळालेला प्रतिसाद पुढील सारणीमध्ये आहे.

सारणी क्रमांक ४.१४.अ

मराठीच्या अध्यापनात इंग्रजी माध्यमाचा परिणाम

| अनुक्रम | विषय | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी माध्यमाची मराठीच्या अध्यापनात अडचण येते | ११ | ४४.०० |
| २ | इंग्रजी माध्यमाची मराठीच्या अध्यापनात अडचण येत नाही | १२ | ४८.०० |
| ३ | प्रतिसाद न देणारे | २ | ८.०० |
| | एकूण - | २५ | १००.०० |

वरील सारणी क्रमांक ४.१४.अ वरून असे दिसून येते की, शेकडा ४४.०० अध्यापकांना मराठीचे अध्यापन करताना इंग्रजी माध्यमाची अडचण येते. ही अडचण कोणत्या स्वरूपाची आहे यासंबंधी याच प्रश्नाच्या "ब" विभागात विचारणा केलेली होती. त्यास मिळालेला प्रतिसाद त्यांच्याच शब्दात

नमूद केला आहे.

मराठी अध्यापकांना त्यांना अध्यापनांत जाणवलेल्या अडचणी पुढील प्रमाणे आहेत -

१] शब्दांचे अर्थ स्पष्ट करताना योग्य पर्यायी शब्द मिळत नाहीत, हवा तो नेमका अर्थ सांगता येत नाही.

२] इंग्रजीचा प्रभाव असल्याने अडचण येते.

३] वेगवेगळया मातृभाषा असणारी मुले एकत्र असतात.

४] अमराठी विद्यार्थ्यांना वाचन व लेखन याबाबतीत अडचण येते.

५] मराठीतील शब्दांना इंग्रजी प्रतिशब्द सांगावे लागतात.

६] विद्यार्थ्यांना मराठीच्या अध्ययनात गोडी वाटत नाही.

७] इंग्रजीतून स्पष्टीकरण द्यावे लागते.

वरील अडचणीच्या स्वरूपावरून असे दिसून येते की, मराठीचा आशय, शब्द, इंग्रजीतून स्पष्ट करून सांगावे लागतात. मराठीचे अध्यापक मराठी माध्यमातील असल्याने त्यांना इंग्रजीतून स्पष्टीकरण करणे अडचणीचे वाटणे साहजिकच आहे. परंतु अध्यापकाने विद्यार्थ्यांना पूर्णपणे आकलन होण्याच्या दृष्टिने स्वत: अभ्यास करून ही अडचण दूर करता येईल. मराठीतून व्यक्त होणारा अर्थ, भावार्थ स्पष्ट होण्यासाठी नेमका इंग्रजी शब्द मिळत नाही अशी अडचण सांगितली आहे. अशावेळी शब्दांचे वाक्यात उपयोग करून, हावभावाने अर्थ स्पष्ट करण्याचा प्रयत्न करावा. सरावाने व प्रभावी अध्यापनाने विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेची गोडी वाढविता येईल.

४.१३.अ] <u>मराठी शब्दाच्या स्पष्टीकरणासाठी इंग्रजी प्रतिशब्दाचा वापर</u>-

प्रश्न क्रमांक २२.अ मध्ये मराठी शब्दांच्या स्पष्टीकरणासाठी इंग्रजी प्रतिशब्द तंतोतंत अर्थ देतात काय ? हे जाणून घेण्याचा हेतू होता, म्हणून जर इंग्रजी प्रतिशब्द तंतोतंत अर्थ देत असतील तर 'होय' पर्याय ठेवावा अन्यथा

'नाही' पर्याय ठेवावा असे सांगितलेले होते. या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद सारणी क्रमांक ४.१४.ब मध्ये नोंदविलेला आहे.

सारणी क्रमांक ४.१४.ब

मराठी शब्दाच्या स्पष्टीकरणासाठी इंग्रजी प्रतिशब्दाचा वापर

| अनुक्रम | विषय | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मराठीच्या शब्दस्पष्टीकरणासाठी इंग्रजी प्रतिशब्द तंतोतंत अर्थ देतात | ८ | ३२.०० |
| २ | मराठीच्या शब्दस्पष्टीकरणासाठी इंग्रजी प्रतिशब्द तंतोतंत अर्थ देत नाहीत. | १४ | ५६.०० |
| ३ | प्रतिसाद न देणारे | ३ | १२.०० |
| | एकूण - | २५ | १००.०० |

वरील सारणी क्रमांक ४.१४.ब वरून असे निदर्शनास येते की, मराठीच्या शब्दामध्ये असणारा अर्थ, आशय, भाव इंग्रजी प्रतिशब्द देऊन तंतोतंत स्पष्ट करता येत नाहीत असे म्हणणाऱ्या अध्यापकांची संख्या जास्त म्हणजे ५६.००% आहे म्हणून मराठीतील अर्थाशय मराठीतूनच अधिक स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

४.१३.ब] मराठीच्या शब्दस्पष्टीकरणासाठी करावा लागणारा अभ्यास -

प्रश्न क्रमांक २२.ब मध्ये मराठीतील शब्दस्पष्टीकरणासाठी इंग्रजी माध्यम असल्यामुळे वेगळा अभ्यास करावा लागतो काय ? हे जाणून घेण्याचा हेतू होता. जर वेगळा अभ्यास करावा लागत असेल तर 'होय' हा पर्याय ठेवावा अन्यथा 'नाही' हा पर्याय ठेवावा असे सांगितले होते. हा प्रश्न बंदिस्त स्वरूपाचा होता. या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद सारणी क्रमांक ४.१४.क मध्ये दिलेला आहे.

सारणी क्रमांक ४.१४.क

शब्द स्पष्टीकरणासाठी करावा लागणारा वेगळा अभ्यास

| अनुक्रम | विषय | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | मराठीतील शब्दस्पष्टीकरणासाठी इंग्रजी माध्यम म्हणून वेगळा अभ्यास करावा लागतो | ८ | ३२.० |
| २ | वेगळा अभ्यास करावा लागत नाही | १५ | ६०.० |
| ३ | प्रतिसाद न देणारे | २ | ८.० |
| | एकूण - | २५ | १००.० |

४.१३.क] मराठीच्या पाठाचा सारांश अगर स्पष्टीकरण करताना होणारा इंग्रजी माध्यमाचा परिणाम -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत माध्यमिक स्तरावर मराठीचे अध्यापन करताना पाठांचा सारांश अगर स्पष्टीकरण इंग्रजी भाषेतून द्यावे लागते काय ? हे जाणून घेण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक २३ ची योजना केलेली होती. हा प्रश्न बंदिस्त स्वरूपाचा होता. पाठांचे स्पष्टीकरण इंग्रजी भाषेतून द्यावे लागत असल्यास 'होय' हा पर्याय तर पाठांचे स्पष्टीकरण इंग्रजी भाषेतून द्यावे लागत नसेल तर 'नाही' हा पर्याय ठेवण्यास सांगितले होते. या प्रश्नास दिलेला प्रतिसाद सारणी क्रमांक ४.१४.ड मध्ये नमूद केलेला आहे.

सारणी क्रमांक ४.१४.ड

पाठांचा सारांश अगर स्पष्टीकरण करताना इंग्रजी माध्यमाचा होणारा परिणाम

| अनुक्रम | विषय | अध्यापक संख्या | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | पाठांचा सारांश अगर स्पष्टीकरण इंग्रजी भाषेतून करावे लागते | ६ | २४.०० |
| २ | पाठांचा सारांश अगर स्पष्टीकरण इंग्रजी भाषेतून करावे लागत नाही | १७ | ६८.०० |
| ३ | प्रतिसाद न देणारे | २ | ८.०० |
| | एकूण - | २५ | १००.०० |

सारणी क्रमांक ४.१४.ड वरून असे दिसून येते की, ६८.०० टक्के अध्यापकांना इंग्रजी माध्यमातील शाळेत मराठीचे अध्यापन करताना पाठाचा सारांश अगर स्पष्टीकरण इंग्रजी भाषेतून करावे लागत नाही, केवळ २४.०० % अध्यापकांचे मत मात्र असे स्पष्टीकरण इंग्रजीतून द्यावे लागते असे आहे. मराठी भाषेचा भाषिक विकास होण्यासाठी पाठातील महत्वाच्या मुद्यांचे स्पष्टीकरण मराठीतून करणेच योग्य वाटते. सरावाने विद्यार्थ्यांना त्याचे आकलन होऊ शकते. भाषेतील अनेकविध शब्दांचाही परिचय होतो. म्हणून मराठीतूनच स्पष्टीकरण देणे योग्य ठरते.

४.१४] <u>इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीचे अध्यापन परिणामकारक होण्याच्या दृष्टीने मराठीच्या अध्यापकानी व्यक्त केलेल्या अपेक्षा</u> -

शिक्षकांसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीमध्ये प्रश्न क्रमांक २४ - मराठी विषयाशी संबंधीत असलेल्या खालील गोष्टीसंबंधी सूचना कराव्यात असे सांगितले होते.

- मराठीचा विद्यार्थी
- मराठी विषयाचा अभ्यासक्रम
- मराठी - विषय अध्यापनाची उद्दिष्टे
- मराठीचे पाठ्यपुस्तक
- मराठी विषयाच्या तासिका
- ग्रंथालय
- शैक्षणिक दृक-श्राव्य साधने
- मराठी विषयाच्या चाचणी परीक्षा
- मराठी विषयाच्या तोंडी परीक्षा
- मराठी विषयाचे अभ्यासानुवर्ती व अभ्यासपूरक कार्यक्रम
- मराठी विषयाचे अभ्यासेतर उपक्रम
- मराठी विषयाचे स्वाध्याय
- हस्ताक्षर व लेखन विकास

- वाचन कौशल्य विकास

अध्यापकांनी प्रस्तुत प्रश्नाला दिलेला प्रतिसाद मराठी विषयासाठी संबंधित असलेल्या प्रत्येक घटकाखाली पुढीलप्रमाणे नोंदविलेला आहे.

४.१४.अ] <u>इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठीचा अध्ययनार्थी</u> –

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीच्या अध्यापनाशी निगडीत असलेल्या घटकामध्ये सर्वप्रथम 'मराठीचा विद्यार्थी' हा घटक दिलेला होता. मराठीचे अध्यापन प्रभावी होण्याच्या दृष्टीने अध्यापकांनी केलेल्या सूचना व मराठीच्या विद्यार्थ्यांच्याबाबत त्यांच्या असलेल्या अपेक्षा त्यांनी प्रतिसादाच्या स्वरूपात व्यक्त केलेल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे –

१] मराठीचा विद्यार्थी मराठीचे अवांतर वाचन करणारा असावा.

२] मराठीच्या वाचनामध्ये विविधता असावी.

३] विद्यार्थ्यांमध्ये मराठी विषयाची आवड, गोडी असावी.

४] मराठीतून स्वत:चे विचार प्रकट करता यावेत.

५] मराठी भाषा समृध्द करण्याचा प्रयत्न करावा.

६] मराठीचा अभिमान असावा.

७] मराठीचे महत्व समजले पाहिजे.

८] मराठीचे अध्यापन करताना चित्रांसारख्या शैक्षणिक साधनांचा वापर केल्यास विद्यार्थी या विषयाकडे आकर्षित होतील.

९] इंग्रजी माध्यमातील विद्यार्थी असले तरी ते महाराष्ट्रातील असल्याने त्यांना मराठीचे महत्व समजावे व त्याचा अभिमानही असावा.

१०] मराठीच्या तासाला मराठीचे वातावरण असावे.

११] विद्यार्थ्यांनी नामांकित लेखकांची दर्जेदार पुस्तके वाचावीत.

१२] पाठ्यपुस्तकाशिवाय इतर पुस्तकेही वाचण्याची सवय असावी.

१३] विद्यार्थी केवळ परीक्षेतील गुणांचाच विचार करणारा नसावा.

१४] विद्यार्थ्यांनी इंग्रजी शब्दांचा वापर न करता संभाषण लेखन करावे.

१५] मराठीच्या बाबतीत हस्ताक्षर व शुध्दलेखन या बाबतीत अधिक दक्ष असावे.

१६] शब्दसंग्रह वाढवावा. संदर्भ वाचन करावे.

१७] वाचन व लेखन यांचा सराव करावा.

१८] पाठ्यपुस्तकाखेरिज इतर वाचन, वर्तमानपत्रे, मासिके यांचे वाचन करावे.

अध्यापकांनी केलेल्या विद्यार्थ्यांबाबतच्या अपेक्षा व सूचना मराठी विषयाचे अध्ययन करण्याच्या दृष्टीने योग्य आहेत. या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी अध्यापकांनी आपल्या अध्यापनामध्ये योग्य तो दिशाबदल करावा. विद्यार्थ्यांना योग्य साहित्य उपलब्ध करून द्यावे.

४.१४.ब] <u>इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी विषयाचा अभ्यासक्रम</u> –

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन करताना विषयाच्या अभ्यासक्रमाबाबत अध्यापकांनी केलेल्या सूचना व अपेक्षा पुढीलप्रमाणे आहेत.

१] सध्याचा अभ्यासक्रम योग्य आहे.

२] अभ्यासक्रमामध्ये वैचारिक, कथात्मक व आकर्षक पाठांचा समावेश असावा. संदर्भांचा समावेश असावा.

३] अभ्यासक्रम सोपा व सुटसुटीत असावा.

४] काव्य, पद्य विद्यार्थ्यांना समजेल असे सोपे असावे.

५] अभ्यासक्रम क्लिष्ट, बोजड नसावा. विद्यार्थ्यांना पेलणारा असावा.

६] अभ्यासक्रम मोठा न ठेवता योग्य कालावधीमध्ये पूर्ण होणारा असावा.

७] अभ्यासक्रमात व्याकरणावर भर असावा.

८] अभ्यासक्रम व्यवस्थित मांडणी असलेला सोपा असावा.

९] तज्ञ शिक्षकांचाही अभ्यासक्रम तयार करण्यामध्ये सहभाग असावा.

१०] इयत्ता ९ वीचा अभ्यास क्लिष्ट आहे. निरस आहे.

वरील सूचनांचा विचार करता असे दिसून येते की, सर्वसाधारणपणे

सर्व विषयासंबंधीच्या ज्या अभ्यासक्रमाबाबतच्या अपेक्षा असतात त्याच मराठी-संबंधीच्याही आहेत. यातील व्याकरणावर भर असावा व पद्य विभाग क्लिष्ट अवघड न ठेवता सोपा असावा. या सूचना मराठी विषयाच्या संदर्भातील आहेत. या सूचना इंग्रजी माध्यमातील मराठीच्या अभ्यासक्रमास योग्य वाटतात.

४.१४.क] <u>इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी विषयाच्या अध्यापनाची उद्दिष्टे</u> -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेमध्ये मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन करताना विषय-अध्यापनाच्या उद्दिष्टांबाबत अध्यापकांच्या कोणत्या अपेक्षा अगर सूचना आहेत हे जाणून घेण्यासाठी प्रश्न क्रमांक २४ मध्ये हा घटक दिलेला होता. त्याबाबत अध्यापकांनी केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१] मराठी भाषेविषयी अभिमान व श्रध्दा निर्माण करणे या उद्दिष्टांचा समावेश असावा.

२] अभिरुची, संभाषण कौशल्य निर्माण करणे यावर उद्दिष्टांमध्ये भर असावा.

३] आकलनात्मक, रचनात्मक व रसग्रहणात्मक उद्दिष्टे असावी.

४] भाषेविषयी गोडी निर्माण करावी. आदर निर्माण करावा.

५] शुध्दलेखन सुधारावे.

६] वाचन, लेखन कौशल्य वाढविणे.

७] राष्ट्रीय भावना व वैचारिकता वाढविणे, कल्पनाशक्ती वाढविणे इ.

उद्दिष्टांबाबत अध्यापकांनी केलेल्या या सूचना फारशा नवीन वाटत नाहीत. मराठी विषयाच्या दिलेल्या उद्दिष्टांमध्ये वर नमूद केलेल्या सूचना अंतर्भूत आहेत. मात्र त्यांच्या पूर्ततेसाठी अध्यापकांनी अधिक सतर्क राहून अध्यापन केले पाहिजे असे सूचवावेसे वाटते.

४.१४.ड] इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठीचे पाठ्यपुस्तक –

मराठी विषयाच्या अध्ययन-अध्यापनाचे सर्वात महत्वाचे व उपयुक्त साधन म्हणजे पाठ्यपुस्तक. भाषेचे पाठ्यपुस्तक म्हणून अध्यापकांना कांही सूचना करावयाच्या असल्यास कराव्यात असे सांगितले होते. त्या प्रश्न क्रमांक २४ मध्ये दिलेल्या प्रतिसादानुसार त्याचे संकलन पुढीलप्रमाणे केले आहे.

१] पाठ्यपुस्तकातील भाषा प्रासादिक असावी.
२] इयत्ता ९ वीचे पाठ्यपुस्तक क्लिष्ट आहे.
३] पाठ्यपुस्तक योग्य आहे. अपवाद इयत्ता ९ वीचे पाठ्यपुस्तक.
४] विद्यार्थ्यांचा वयोगट लक्षात घेऊन पाठांची निवड करावी.
५] पाठ्यपुस्तक चांगले आहे.
६] पाठ्यपुस्तकाचे अध्यापन करताना ग्रंथालयाचेही सहाय्य हवे.
७] पाठ्यपुस्तकातील लेखन शुध्द असावे.
८] पाठ्यपुस्तकामध्ये पाठास पूरक अशी चित्रे असणे गरजेचे आहे.
९] पाठ्यपुस्तकातील पाठांची निवड योग्य आहे.
१०] पाठ्यपुस्तकातील कांही पाठ कंटाळवाणे आहेत.
११] कांही पाठ्यपुस्तके क्लिष्ट आहेत.

वरील सूचनावरून असे निदर्शनास येते की, पाठ्यपुस्तकातील ९ वीच्या पाठ्यपुस्तकाबाबत ते क्लिष्ट व कंटाळवाणे आहे असे अध्यापकांचे म्हणणे आहे. वास्तविक इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषय द्वितीय भाषा म्हणून शिकविला जातो. त्याची उद्दिष्टेही द्वितीय स्तरावर आहेत. त्यानुसार पाठ्यपुस्तकात क्लिष्टता असणे योग्य नाही. ही सूचना विचारात घेण्यासारखी आहे. बाकी इतर सर्व सूचना सर्वसामान्य स्वरूपाच्या आहेत.

४.१४.इ] इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठी विषयांच्या तासिका

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाचे द्वितीय स्तरावर अध्यापन करत असताना आठवडयामध्ये चार तासिका असतात. या तासिका पुरेशा

आहेत का हे जाणून घेण्याच्या उद्देशाने मराठी विषयाच्या तासिकेबाबत अध्यापकांचे मत जाणून घेण्यासाठी या घटकासंबंधी सूचना करण्याविषयी सांगितले होते. त्यानुसार अध्यापकांनी केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१] आहे त्यापेक्षा जास्त तासिका असाव्यात.

२] आहे ह्या तासिका पुरेशा आहेत.

३] प्रत्येक आठवडयात दोन तासिका जास्त असाव्यात.

४] सध्या असणाऱ्या तासिका कमी आहेत.

५] इतर विषयांच्या तुलनेने तासिका समप्रमाणात नाहीत.

६] आठवडयात मराठीचे पाच तास असावेत.

७] अधिक तासिका हव्या आहेत.

८] व्याकरण अध्यापनासाठी जादा तासिका असाव्यात.

९] मराठीच्या तासिकस अपूऱ्या पडतात.

वरील अध्यापकांच्या सूचनांवरुन असे निदर्शनास येते की, मराठीच्या अध्यापनास भाषिक विकास व व्याकरणाचे अध्यापन यासाठी जास्त तासिका असाव्यात. अशी बहुतांशी अध्यापकांची सूचना व अपेक्षा आहे. या चार तासिका कमी पडतात असा त्यांचा अनुभव दिसून येतो.

४.१४.फ] ग्रंथालय -

मराठी विषयाच्या अध्ययन-अध्यापनाशी निगडीत अशा ग्रंथालय या घटकाविषयी अध्यापकांच्या सूचना व अपेक्षा व्यक्त करण्यास सांगितल्या होत्या. त्यानुसार अध्यापकांनी केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१] शाळेतील ग्रंथालय सुसज्ज असावे.

२] ग्रंथालयामध्ये नाटक, कथा, कादंबऱ्या यांचाही समावेश असावा.

३] ग्रंथालयामध्ये भरपूर पुस्तके असावीत.

४] ग्रंथालय समृध्द असावे.

५] व्याकरणाची व निबंधाची पुस्तके असावीत.

६] गोष्टीचीही पुस्तके ग्रंथालयात असावीत.

७] ग्रंथालय स्वतंत्र असावे.

८] विविध रस निर्माण करणारी पुस्तके असावीत.

९] ग्रंथालयात जुनी व नवी पुस्तके असावीत.

१०] सर्व प्रकारची पुस्तके असावीत.

११] ग्रंथालयात दलित लेखकांची पुस्तके, आत्मचरित्रे असावीत.

१२] प्रत्येक शाळेत ग्रंथालय असलेच पाहिजे.

१३] ग्रंथालय वैविध्यपूर्ण असावे.

१४] ग्रंथालय संस्कारक्षम पुस्तकांनी युक्त असावे.

१५] ग्रंथालयात संदर्भ पुस्तके असावीत.

१६] ग्रंथालय आदर्श असावे.

१७] विविध प्रकारची नियतकालिके असावीत.

वरील सर्व सूचनावरून असे निदर्शनास येते की, ग्रंथालय कसे असावे यासंबंधीचे सर्वसाधारण निकष लक्षात घेऊन सूचना केलेल्या आहेत. उदा. ग्रंथालय समृध्द, आदर्श, सुसज्ज, वैविध्यपूर्ण, स्वतंत्र असावे इ. भाषा विकासाच्या दृष्टीने सूचना क्रमांक २,५,६,११,१४,१७ या सूचना विचारात घेण्यासारख्या आहेत. या सूचना लक्षात घेऊन ग्रंथालय समृध्द करता येईल.

४.१४.ग] <u>मराठी विषयाची दृक-श्राव्य साधने</u> -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठीचे अध्यापन करताना मराठी विषयासाठी कोणती दृकश्राव्य साधने वापरावीत, ती साधने कशा प्रकारची असावीत यासंबंधी अध्यापकांची मते जाणून घेण्याच्या उद्देशाने याबाबतीत अध्यापकांना प्रश्न क्रमांक २४ मध्ये सूचना करण्यास सांगितले होते. त्या प्रश्नास मिळालेल्या प्रतिसादावरून दृकश्राव्य साधनासंबंधी केलेल्या सूचनांचे संकलन पुढील प्रमाणे केलेले आहे.

१] मराठी विषयासाठी दृकश्राव्य साधने असावीत.

२] दूरदर्शन व आकाशवाणीवरील शैक्षणिक कार्यक्रम दाखवावेत.

३] शाळेतील शैक्षणिक साधनांचा वापर झाला पाहिजे.

४] मराठीचे अध्यापन करताना विविध दृकश्राव्य साधनांचा वापर करावा.

५] तीन-चार महिन्यातून शैक्षणिक साधनांचा वापर करावा.

६] शैक्षणिक साधनांचा वापर केला जात नाही.

७] शैक्षणिक साधने विद्यार्थ्यांना आकलन होण्यास उपयोगी पडतात.

८] कवितेच्या ध्वनीफिती असाव्यात.

९] शैक्षणिक साधनांचा वापर अधून-मधून करावा.

१०] दूरदर्शन, आकाशवाणीवरून शैक्षणिक कार्यक्रम दाखविण्यासाठी कॅसेटस् असाव्यात.

११] पुरेशी शैक्षणिक साधने असावीत.

१२] शाळेमध्ये दृश्यफित मुद्रक [व्हि.सी.आर.] असावा.

वरील सूचनांवरून असे लक्षात येते की, अध्यापकांना शैक्षणिक साधनांचा वापर करावा असे वाटते, परंतु त्याची उपलब्धता शाळेकडून व्हावी अशी अपेक्षा आहे. मात्र काही अध्यापकांच्या मते शाळेतील जी साधने उपलब्ध आहेत त्याचा वापर होणेही महत्वाचे आहे.

४.१४.ह] <u>मराठी विषयाच्या चाचणी परीक्षा</u> -

मराठी विषयाच्या अध्ययन-अध्यापनाशी निगडीत असलेली आठवी बाब म्हणजे मराठी विषयाच्या चाचणी परीक्षा. मराठीचे अध्यापन प्रभावी होण्याच्या हेतूने मराठी विषयाच्या चाचणी परीक्षांच्या संदर्भात अध्यापकांना सूचना करण्यास सांगितले होते. त्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१] मराठी विषयाच्या चाचणी परीक्षा घेतल्या जातात.

२] लेखनाचा सराव होण्यासाठी, विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी चाचणी परीक्षा घ्याव्यात.

३] मराठी विषयाच्या चाचणी परीक्षा प्रत्येक आठवड्यात घ्याव्यात.

४] मराठी विषयाच्या चाचणी परीक्षा तीन-चार महिन्यातून घ्याव्यात.

५] मराठी विषयाच्या चाचणी परीक्षा घेतल्या जातात, पण त्याचे गांभीर्य राखले जात नाही.

६] मराठी विषयाच्या अध्यापनाच्यादृष्टीने चाचणी परीक्षा उपयुक्त ठरतात.

७] वर्षातून चार वेळा चाचणी घ्यावी.

८] चाचणी परीक्षा महत्वाची असून वर्षातून चार घ्याव्यात.

वरील अध्यापकांनी केलेल्या सूचनानुसार असे निदर्शनास येते की, मराठी विषयाच्या अध्यापनास उपयुक्त सुधारणा होण्यासाठी चाचणी परीक्षा घेणे आवश्यक आहे. मात्र त्याचे गांभीर्य राखले पाहिजे. या चाचणी परीक्षांच्या निकालावरून अध्यापनाची योग्य दिशा लक्षात येते. आवश्यकतेनुसार बदल करता येतो. हा फायदा विचारात घेऊन कांही अध्यापकांनी चाचणी परीक्षा वर्षातून चार वेळा किंवा आठवडयातून एक चाचणी परीक्षा घ्यावी अशी सूचना केलेली आहे.

४.१४.ज] <u>मराठी विषयाच्या तोंडी परीक्षा</u> -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्याच्या हेतूने मराठी विषयाच्या तोंडी परीक्षेच्या बाबतीत अध्यापकांना सूचना करण्यास सांगितले होते. अध्यापकांनी ज्या सूचना केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१] इंग्रजी माध्यमाच्या शाळेत वर्षातून दोन वेळा तोंडी परीक्षा घेतल्या जातात.

२] इयत्ता ५ वी ते ७ वी पर्यन्तच्या वर्गासाठी तोंडी परीक्षा घेतल्या जातात.

३] तोंडी परीक्षेमध्ये लेखी परीक्षेपेक्षा जास्त गुण मिळतात.

४] वाचन, पाठांतर या कौशल्याचे मूल्यमापन करता येते.

५] तोंडी परीक्षा इयत्ता ५ वी ते ९ वी पर्यन्तच्या वर्गासाठी असाव्यात

६] प्रत्येक घटक शिकवून झाल्यानंतर मराठी विषयाची तोंडी परीक्षा द्यावी.

७] मराठी विषयाची तोंडी परीक्षा महिन्यातून एक असावी.

८] मराठी विषयासाठी तोंडी परीक्षा आवश्यक आहेत. त्यामुळे मौखिक उच्चाराचे ज्ञान अधिक पक्के होते.

९] तोंडी परीक्षेसाठी अंतर्गत गुणदान असावे.

१०] तोंडी परीक्षा वर्षातून दोनदा व्हावी.

११] तोंडी परीक्षा ठेवल्याने पाठांतर क्षमता, उच्चारक्षमता सुधारते. न बोलणारे विद्यार्थी बोलू शकतात.

वरील सूचनांवरून असे लक्षात येते की, इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयासाठी तोंडी परीक्षा घेणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांची उच्चार क्षमता, पाठांतरक्षमता व प्रगटीकरण क्षमता आजमावता येते. कारण भाषा लिहिण्याइतकेच बोलण्यासही महत्व आहे.

४.१४.ख] <u>मराठी विषयाचे अभ्यासानुवर्ती व अभ्यासपूरक कार्यक्रम</u> -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन प्रभावी होण्यासाठी अध्ययन-अध्यापनाशी निगडीत असणाऱ्या अभ्यासानुवर्ती व अभ्यासपूरक कार्यक्रमाबाबत अध्यापकांनी सूचना कराव्यात असे प्रश्न क्रमांक २४ च्या या घटकाखाली लिहिण्यास सांगण्यात आले होते. त्या प्रश्नास मिळालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे.

१] मराठी विषयाच्या अभ्यासानुवर्ती व अभ्यासपूरक कार्यक्रमामध्ये चर्चा, परिसंवाद, निबंध स्पर्धा ठेवाव्यात.

२] लेखन विकासासाठी हस्ताक्षर स्पर्धा ठेवाव्यात.

३] अभ्यासानुवर्ती व अभ्यासपूरक कार्यक्रम असावेत.

४] कथाकथन, व्याख्याने, सहलीचे आयोजन करावे.

५] अभ्यासानुवर्ती अभ्यासपूरक कार्यक्रमांची संख्या गरजेनुसार वाढवावी.

६] वार्षिक परीक्षेनंतर शेवटी असे कार्यक्रम असावेत.

७] अभ्यासानुवर्ती कार्यक्रमात भाग घेण्यास प्रोत्साहन द्यावे.

८] गृहपाठ, व्याकरण, स्वाध्याय, परिसंवाद, हस्ताक्षर स्पर्धा, सहली, संवाद, वक्तृत्व स्पर्धा इ. आयोजन करावे.

वरील अध्यापकांनी केलेल्या सूचना खरोखरच स्विकारणीय आहेत. सभाधीटपणा येण्यासाठी, आत्मप्रगटीकरण करता येण्यासाठी विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांसमोर बोलण्याची संधी द्यावी लागेल. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी बोलण्याची संधी अशा कार्यक्रमातूनच प्राप्त होत असते. विविध स्पर्धा व तत्सम कार्यक्रमामुळे मराठी भाषेविषयी अभिरूची, गोडी निर्माण होण्यास मदत होते. एक गोष्ट याबाबतीत सुचवावीशी वाटते, ती म्हणजे या कार्यक्रमांचा अतिरेक टाळला पाहिजे. हे कार्यक्रम अभ्यासाला पूरक आहेत ही दृष्टी ठेवली पाहिजे.

४.१४.ल] <u>मराठी विषयाचे अभ्यासेतर कार्यक्रम</u> –

मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन प्रभावी व्हावे यासाठी अभ्यासेतर कार्यक्रमाबाबत अध्यापकांना सूचना कराव्यात असे सांगितले होते. अध्यापकांनी केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे संकलीत केल्या आहेत.

१] शाळेत कोणतेही अभ्यासेतर कार्यक्रम घेतले जात नाहीत.

२] अभ्यासेतर उपक्रमामध्ये निसर्गवर्णनात्मक धडे/कविता यांच्या स्पष्टीकरणासाठी निसर्ग सौन्दर्य स्थळांना भेटी द्याव्यात.

३] वक्तृत्व स्पर्धा, हस्ताक्षर, एकांकिका, स्पर्धा असाव्यात.

४] कविता, समुहगीत, नाट्य, वक्तृत्व इ. स्पर्धा कार्यक्रम असावेत.

५] वाचन, निबंध स्पर्धांचे आयोजन करावे.

६] अभ्यासेतर कार्यक्रम कमी असावेत.

७] श्रेष्ठ वक्त्यांची व्याख्याने ठेवावीत. छोटी संमेलने घ्यावीत.

८] अभ्यासेतर उपक्रम आवश्यक आहेत.

९] कथाकथन, चर्चा, परिसंवाद असावेत.

१०] स्नेहसंमेलन व यासारख्या कार्यक्रमात सहभाग घ्यावा.

वरील सूचनांवरून असे लक्षात येते की, मराठी विषयाच्या अध्ययन-अध्यापनासाठी अभ्यासेतर कार्यक्रमांचे आयोजन पोषक ठरते मात्र यांचा अतिरेक झाल्यास अध्ययन-अध्यापनावर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते. म्हणून अभ्यासेतर कार्यक्रम मापक्त असावेत.

४.१४.म] <u>मराठी विषयाचे स्वाध्याय</u> -

मराठी विषयाच्या स्वाध्यायांचे स्वरूप कसे असावे यासंबंधी अध्यापकांच्या कोणत्या अपेक्षा व सूचना आहेत हे जाणून घेण्यासाठी विशेषत: इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारचे मराठी विषयासाठी स्वाध्याय असावेत, यासंबंधीच्या सूचना कराव्यात असे अध्यापक प्रश्नावलीतील प्रश्न क्रमांक २४ च्या *II भागात सांगितले होते. त्यास मिळालेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे.

१] अनेक स्वाध्यायांपैकी कोणता स्वाध्याय करावयाचे हे विद्यार्थ्यांनी निवड करून ठरवावे.

२] विद्यार्थ्यांनी दिलेले स्वाध्याय स्वत:च सोडवावेत.

३] शाळेमध्ये स्वाध्याय घेतले जातात.

४] शुध्दलेखन, निबंध, विविध चित्रे जमविणे, काढणे या सारखे स्वाध्याय असावेत.

५] पाठास अनुरूप असे स्वाध्याय असावेत.

६] लेखनात्मक स्वाध्याय असावेत.

७] मनाचे श्लोक, सुभाषिते पाठ करणे स्वाध्यायासाठी द्यावे.

८] स्वाध्यायाचा दररोज पाठपुरावा घ्यावा.

९] स्वाध्यायानंतर त्यावर चर्चा करावी.

१०] प्रत्येक पाठानंतर स्वाध्याय दिला जावा.

११] स्वाध्याय विद्यार्थ्यांना झेपतील असे असावेत.

१२] लेखन, व्याकरणावर आधारित स्वाध्याय असावेत.

१३] स्वाध्याय, प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी स्वभाषेत सोडवावेत.

१४] पाठाखालील स्वाध्यायाबरोबर इतरही स्वाध्याय दिले जावेत.

वरील अध्यापकांनी केलेल्या सूचनांवरून असे निदर्शनास येते की, भाषा विषयाच्या सरावासाठी व भाषिक विकासासाठी स्वाध्यायाची गरज निश्चितच आहे. म्हणून स्वाध्याय हे लेखन स्वरूपाचे, कृती स्वरूपाचे, वाचन स्वरूपाचे असावेत. स्वाध्याय पूर्ण केला काय ? किंवा करण्यापूर्वी तो कसा पूर्ण करावा याविषयी चर्चा करावी. स्वाध्यायामध्ये विविधता असावी व हे स्वाध्याय विद्यार्थ्यांनी स्वत:, स्वभाषेमध्ये सोडविण्याचा आग्रह धरावा. पाठाखालील स्वाध्याय व इतर पूरक स्वाध्याय द्यावेत. अनेक स्वाध्याय द्यावेत व विद्यार्थ्यांना त्यांच्या अभिरूचीनुसार त्यापैकी कांही स्वाध्याय निवडण्याची संधी द्यावी. केवळ स्वाध्याय देऊन भागणार नाही तर ते स्वाध्याय तपासण्याचे कामही नियमित व वेळेवर व्हावे.

४.१४.न] <u>हस्ताक्षर व लेखन विकास</u> -

इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाचे अध्यापन प्रभावी व्हावे यासाठी अध्ययन-अध्यापनाशी निगडीत असलेल्या हस्ताक्षर व लेखन विकास या बाबींसंबंधी सूचना करण्यास अध्यापकांना सांगितले होते. त्यानुसार अध्यापकांनी दिलेला प्रतिसाद पुढीलप्रमाणे आहे.

१] हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात येत नाहीत. त्या स्पर्धा घ्याव्यात.

२] हस्ताक्षर सुधारण्यासाठी बर्गे स्लेटचा वापर करावा.

३] दररोज लेखनाचा सराव करावा.

४] लेखनामध्ये वाक्प्रचार, म्हणी, यांचा वापर करण्यास प्रवृत्त करावे.

५] लेखनास पोषक अशा विविध स्पर्धा घ्याव्यात.

६] लेखन विकासासाठी खास वेगळे प्रयत्न करावेत.

७] निबंध स्पर्धा घ्याव्यात.

८] हस्ताक्षर व शुध्दलेखन यावर भर असावा.

९] हस्ताक्षर सुधारण्यासाठी प्रयत्न करावेत. सराव घ्यावा.

१०] इंग्रजी माध्यमाची लिपी व मराठी माध्यमाची देवनागरी लिपी यातील फरक लक्षात घेऊन हस्ताक्षर सुधारणा व्हावी.

अध्यापकांनी केलेल्या सूचनांवरून असे लक्षात येते की, लेखन विकासामध्ये हस्ताक्षर हा महत्वाचा घटक आहे. इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील विद्यार्थ्यांना इंग्रजी लेखनाचा सराव असतो. इंग्रजी व मराठी या दोन्हींच्या लिपीमध्ये फरक असल्याने इंग्रजी लेखनाच्या सरावाच्या मराठी हस्ताक्षरास फारसा फायदा होत नाही. म्हणून हस्ताक्षराबाबत या अध्यापकांना विशेष प्रयत्न करावा लागतो. हस्ताक्षराबरोबर शुध्दलेखनाची समस्याही असते. म्हणून हस्ताक्षर व शुध्दलेखन या दोन्हीमध्ये प्रगती व विकास साधण्यासाठी विविध स्पर्धा व बर्गे स्लेटचा वापर करण्याविषयीच्या सूचना जास्त आहेत. या सूचना स्विकारणीय आहेत.

४.१४.५]- <u>मराठी विषयातील वाचन विकास</u> -

मराठी विषयाच्या भाषिक उद्दिष्टांपैकी ग्रहणात्मक उद्दिष्टांतर्गत येणारे वाचन कौशल्य विकसित करण्यासाठी या घटकाबाबत अध्यापकांच्या अपेक्षा, सूचना जाणून घेण्यासाठी अध्यापक प्रश्नावलीमध्ये अध्यापकांना सूचना कराव्यात असे सांगण्यात आले होते. त्यानुसार अध्यापकांनी केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

१] विविध नेत्यांची जयंती, पुण्यतिथी साजरी करून त्या निमित्त वक्तृत्व स्पर्धा घेतल्यास विद्यार्थी वाचन करतील.

२] संवाद वाचन घ्यावे.

३] कथावाचन, नाटयवाचन घ्यावे. यासाठी वाचनसाहित्य उपलब्ध करून द्यावे.

४] वैयक्तिक व सामुहिक वाचन घ्यावे.

५] प्रकटवाचनावर भर द्यावा. आशयानुरूप वाचनात योग्य चढउतार करण्यास सांगणे.

६] वाचनासाठी स्वतंत्र तास असावा.

७] नियमित वाचनाचा सराव करावा.

८] अवांतर वाचन करण्यासाठी परिसंवाद, चर्चा ठेवाव्यात.

९] वाचन योग्य आवाजात व शुध्द, स्पष्ट उच्चारात व्हावे, यासाठी अध्यापकांनी प्रयत्न करावेत.

वरील सूचनांचा विचार करता असे दिसून येते की, विद्यार्थी इंग्रजी माध्यमातील असल्याने मराठी शब्दांच्या उच्चाराकडे, चढउताराकडे, विरामचिन्हानुसारी वाचन या बाबीकडे आवर्जून लक्ष देणे महत्वाचे आहे. त्यादृष्टीने नियमित वाचनाचा सराव करून घेणे, वाचनासाठी स्वतंत्र तासाची योजना करणे, विविध उपक्रम आयोजित करून विद्यार्थ्यांना वाचनासाठी प्रवृत्त करणे या सूचना स्वागतार्ह आहेत. या सूचनांचा अवलंब केल्यास वाचन कौशल्य विकसित होण्यास निश्चित मदत होईल.

४.१५] <u>संशोधनास उपयुक्त अशा बाबी</u> :-

अध्यापक प्रश्नावलीमध्ये नसणाऱ्या परंतु प्रस्तुत संशोधनास उपयुक्त ठरतील अशा कांही बाबी असतील तर त्या जाणून घेण्यासाठी मराठी विषय शिकविणाऱ्या अध्यापकांना अशा बाबी नमूद करण्याविषयी प्रश्न क्रमांक २५ मध्ये सांगितलेले होते. त्यानुसार अध्यापकांनी ज्या बाबी सुचविल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे संकलीत करून मांडल्या आहेत.

१] समाजातून श्रेष्ठ वक्ते आमंत्रित करून त्यांचे परिसंवाद, कथाकथन, व्याख्याने अशा कार्यक्रमांचे आयोजन करावे.

२] इंग्रजी माध्यमामध्ये इंग्रजीकडे अधिक ओढा असतो तो कमी करून मराठी विषयाचेही महत्व पटवून देणे व दैनंदिन व्यवहार मराठीतून

करण्यास प्रवृत्त करावे.

३] विद्यार्थ्यांचे कलागुण, अभिरूची लक्षात घेऊन मराठी भाषेसंबंधी प्रेम वाढवावे.

४] इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील मराठीच्या पाठ्यपुस्तकात चित्रांचा वापर करणे गरजेचे वाटते. उदा. माळढोक पक्षी, डॉ.पंजाबराव देशमुख इ.

५] मराठी भाषा द्वितीय स्तरावर अभ्यासली जाते म्हणून ती गौण आहे हा गैरसमज दूर करावा व मराठी भाषेचे महत्व पटवून द्यावे व भाषेची गोडी निर्माण करावी.

वरील अध्यापकांनी सूचविलेल्या बाबींचा संशोधन कार्यास उपयोग होईल व मराठी विषयाच्या अध्ययन-अध्यापनाविषयीच्या समस्या दूर करण्यासाठी जे उपाय शोधावे लागतील. त्या कामी वरील सूचनांचा निश्चीत विचार करता येईल. संशोधिका त्यादृष्टीने विचार करतील, निष्कर्ष व शिफारशी करताना वरील बाबी लक्षात घेतील.

४.१६] <u>समारोप</u> :-

प्रकरण ३ मध्ये विद्यार्थी प्रश्नावलीचे विश्लेषण व वर्गीकरण केलेले आहे व प्रकरण ४ मध्ये अध्यापकांनी अध्यापक प्रश्नावलीस दिलेल्या प्रतिसादाचे व त्याद्वारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण, वर्गीकरण व संकलन केलेले आहे. या दोन्ही प्रकरणातील माहितीच्या आधारे अन्वयार्थ लावून पुढील प्रकरण ५ मध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन करताना येणा-या समस्यांविषयीचे निष्कर्ष काढून त्याआधारे योग्य शिफारशी केल्या आहेत.

-x****x-